# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरूवार, ४ एप्रिल २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)


⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२०

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 4 APRIL 2024 | adhunikkesari.com | ● YEAR-03 ● ISSUE-220 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05








आधुनिक केसरी

युद्ध कांडाच्या ४४ व्या अध्यायापर्यंत रामायणाची रचना नाथांनी केली. मग नाथांनी श्रोत्यांना सांगितले की मी आता तुमचा निरोप घेणार आहे. यापुढे मी रामायण सांगणार नाही. तेव्हा लोकांनी विचारले की, मग हे रामायण कोण पूर्ण करील ? तेव्हा नाथांनी गावबाला बोलावले, त्याच्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हटले, " हा गावबा पूर्ण करील. " आणि खरोखर नाथांची कृपा झाल्याने गावबासारख्या मठ्ठ मुलाने ते रामायण श्रोत्यांना सांगून पूर्ण केले.

नाथषष्ठी या दिवशी नाथांनी समाधी घेतली. या दिवसाचे महत्व त्यांच्या जीवनात फार आहे. ते असे की फाल्गुन वद्य षष्ठीला त्यांचे गुरु जनार्दनस्वामी यांचा जन्म झाला. षष्ठीलाच त्यांना श्री दत्तात्रयाचे दर्शन घडले. नाथानाही त्यांनी ज्या दिवशी दत्तात्रयांचे दर्शन घडवले तो दिवसही षष्ठीचा होता. जनार्दनस्वामींनी समाधी घेतली ती फाल्गुन व. षष्ठीलाच. अशा चार महत्वाच्या घटना या दिवशी घडल्याने नाथांनी आपल्या निर्वाणासाठी हाच दिवस निवडला. तो दिवस होता फाल्गुन व. षष्ठी शके १५२१ म्हणजेच २५ फेब्रुवारी १५९९. विठ्ठलभक्त संतांच्या परंपरेत नाथांचे स्थान अढळ आणि अमर राहील. त्यांना साष्टांग दंडवत.








## आनंदी पहाट

## घवघवीत यश मिळाले की आनंद प्राप्त होतोच

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील अनेक निर्णय इतरांच्या विचारांनी घेतले जातात किबहुना त्यांच्या मतांवर ठरत असतात. आपल्या स्वतःसाठी अगदी आपल्याच अंतर्मनांत वैचारिक मंथन आपण का घडवून आणत नाही? प्रत्येक विचाराची सुरुवात सकारात्मकतेनं होणं जरुरीचं, आवश्यक असल्याचं समजून घेतलं पाहिजे. एका विशिष्ठ वैचारिक बैठकीच्या चौकटीत राहून मानसिकदृष्ट्या सुखद वातावरणाची आपल्याला सवय झालेली असते. ती चौकट भेदून काही वेगळा विचार करता येऊ शकतो, त्याचा निराळा अनुभव येऊ शकतो हेच आपण लक्षांत घेऊ शकत नाही. सद्यःस्थितीतील आपली जीवनशैली, दिनचर्या, व्यावसायिक व्यवधानं आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या ह्या सर्व बाबींमुळे अनेकदा आपण स्वतःसाठी सुद्धा पुरेसा वेळ देऊ शकत नाही. अनेक गोष्टींचा थोडा हटके विचार करू शकत नाही अथवा तसा तो करायचा विचारही मनांत येत नाही. आपण, शिक्षणाअगोदर संस्कार, व्यापाराअगोदर व्यवहार आणि देवाअगोदर स्वतःच्या अंतर्मनाला समजून घेतलं तर जीवनांत कोणतीच अडचण येत नाही. मनाला मनःपूर्वक मानलं, समजून घेतलं, मोकळं केलं, आनंदी ठेवलं, तंदुरुस्त ठेवलं, सकारात्मक विचारांमध्ये गुंतवलं आणि नकारात्मक विचारांपारून दूर ठेवलं कि फक्त आणि फक्त भरघोस घवघवीत यश आणि आनंदच प्राप्त होत राहतो. एकमेकांच्या उणिवा दूर करणं आणि जाणीवा जपणं ह्या प्रेरणा अशाच वातावरणात मिळत असतात. स्वतःपेक्षा दुसऱ्यांकडून, इतरांकडून अवास्तव अपेक्षा केल्या जाऊ लागल्या कि, परस्परांमध्ये तणावाचं वातावरण निर्माण होऊ लागतं. कुटुंबामध्ये संवाद, सहवास, सहकार, सहभाग, समानता ह्या बाबी टिकवून ठेवणं जरुरीचं असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी


## एक रूप झाला | जीव शीव ||

सुखावलो देवा | तुझ्या भजनात ||
काय भोजनात | गोडी आता ? ||१||
नादावला जीव | पंढरीच्या वाटे ||
चैतन्यचि भेटे | चैतन्याला ||२||
होतो चिंता मुक्त | संतांच्या संगती ||
येते अनुभूती | दिव्यत्वाची ||३||
दृष्टी पुढे उभा | सृष्टीचा नियंता ||
हाचि अभियंता | विटेवरी ||४||
सगुण निर्गुण | भेदही निमाला ||
एकरूप झाला | जीव शीव ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प ३२वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


### सरस्वती कामधेनू

भाषा जशी ध्वनींची असते तशी ती ध्वनिरहित चिंतनाची असते. नित्य आतल्याआत सुरू असलेले ज्ञानाचे अग्निहोत्र म्हणजे चिंतन होय. या चिंतनाला निरीक्षण, परीक्षण, प्रयोग, स्वानुभूतिची जोड लाभली की ते विविध ज्ञान-दर्शनांच्या रूपाने आविष्कृत होते. अशा शब्दाविष्काराला, वाक्ला पतंजलिने 'कामधेनु' म्हटले आहे - "एकः शब्दः सम्यक् ज्ञातः सुप्रयुक्तः स्वर्गे लोके कामधेनु भवतिः।" जल व वाक् अशा दोन्ही अर्थांनी सरस्वती कामधेनू आहे. ती परम शिवा आहे. नदी रूपाने सरस्वती माधुर्य, रसामृताचा जीवनस्त्रोत आहे. ती सुख, आनंद, स्नेह, ममता, करुणा यांचा प्रवाह आहे. यातूनच जीवन प्रशस्त होते. भाव, ज्ञान व कर्म जीवनाला प्रशस्त करणारे असावे. गुप्त सरस्वती आध्यात्मिक प्रतीकार्थाच्या रूपाने शरीरांतर्गत कुंडलिनीचा, सुषुम्नेचा चैतन्य प्रवाह आहे. हा चैतन्य प्रवाह ऋषींनी योग, भक्ती, साधना, ध्यान, तत्त्वज्ञान यांच्या माध्यमातून लोकजीवनात, लोकमनात प्रवाहित केला होता. त्यामुळे सुख सुविधांची रेलचेल नसून प्राचीन काळच्या समाजाचे जगणे सरस, सप्राय, स्नेहपूर्ण होते. त्यातूनच सुंदर कला व चेतन संस्कृती निर्माण झाली. 'देवी सप्तशती'नुसार महासरस्वती चंडमुंड विनाशिनी दुर्गा आहे. पौराणिक संदर्भानुसार देवी सरस्वती 'वीणापुस्तक रंजित हस्ते', 'श्वेतवर्णा', 'तुषारहार धवला', 'श्वेत आभरणा', 'श्वेत पद्मासना', 'कुर्वेन्दुसम', 'श्वेतहंसवाहिनी' आहे. हे रूप युगानुयुगे जनमानसात रुजले, रूढ झाले आहे. ज्ञानाचे अत्यंत पवित्र, शुभ्र, महाउज्ज्वल लावण्य म्हणजे समस्त दृष्टी, पंचामृतात स्नान करून गंगाजलाने स्वच्छ व्हावी, असा बोध होय. ज्ञानाने प्राप्त दृष्टी 'स्व'च्या पलिकडे सर्वांच्या कल्याणाचा वेध घेत सर्वात्मक आपुलकीने जीवनाशी एकरूप होते.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जड़ चेतन संयोग में, माया जीव सम्बन्ध । यौगिक कारण देह है, जड़ फन्दा जिव बन्ध ।।२२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/२२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
माया आणि जीवात्म्याचा संबंध हा जड-चेतनाचा संबंध आहे यालाच कारण देह म्हणतात. प्रकृती जड आहे आणि आत्मा चेतन आहे. या दोहोंच्या संबंधामुळे जीव प्रकृती बंधनात अडकून जन्म-मृत्यू, संसार-दुःखास प्राप्त करतो. यालाच जड-चेतनाची ग्रंथीही (गाठ) म्हणतात. ही गाठ सुटल्यावर जीव आपल्या शुद्ध स्वरूपात येऊन परमानंद प्राप्ती साठी प्रयत्न करतो. चेतन शुद्ध स्वरूप प्राप्त झाल्यावर प्रभूची भक्ती आणि परमानंदाची प्राप्ती होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात

आधुनिक केसरी

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो. एकजण संतांना उद्देशून म्हणाला, "तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता." वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे. 'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी'पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते. संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही !एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदुःखाच्या जाळ्यात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच राहतो. कर्म करूनही तो अलिप्त राहतो.



आपण मात्र सुखदुःखात गुरफटून जातो. संताचे अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वादरूपच ठरते. सत्पुरुष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरुष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला-वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरुष झालेले आढळतात. संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते. लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत. ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात. सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले; एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले; आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही; नेहमी समाधानच राहील.

**१००. जग संतांशिवाय असणे शक्य नाही; आम्हांला त्यांना ओळखता येत नाही.**

## निरूपण

आधुनिक केसरी

बहुत काय बोलावें । श्रोतीं संकेतें जाणावें ।
पुढें बोलिजे स्वभावें । आदिभूतिक ॥ ५६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आध्यात्मिकतापनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥
समास सातवा : आधिभौतिक ताप
मागां जालें निरूपण । आध्यात्मिकाचें लक्षण ।

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, ४ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# जनतेचा इंडिया आघाडीवर वाढता विश्वास

## नाना पटोले : भाजपाला सत्तेतून हद्दपार करण्याचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : खासदार राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर व नंतर मणिपूर ते मुंबई पदयात्रा काढून सर्व समाज घटकांशी चर्चा केली, त्यांच्याशी संवाद साधला व त्यांना न्याय देण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला, यातूनच काँग्रेस पक्षाने ५ न्याय व २५ गॅरंटी जाहीर केल्या आहेत. महिला, युवा, कामगार, शेतकरी, हिस्सेदारी न्याय असा संकल्प जाहीर केला असून राज्यात घरोघरी जाऊन हा संदेश पोहचवला जाईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.**



टिळक भवन येथे काँग्रेसच्या प्रचार समिती व समन्वय समितीची बैठक पार पडली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणनिती ठरवण्यासाठी झालेल्या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. या बैठकीनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. ते पुढे म्हणाले की, 'गॅरंटी' हा शब्दही राहुल गांधी यांनी आधी प्रचारात वापरला, कर्नाटक विधानभा निवडणुकीवेळी काँग्रेसने ज्या गॅरंटी दिल्या त्यावर जनतेने विश्वास टाकला व सत्ता दिल्यानंतर त्याची अंमलबजावणीही सुरु झाली आहे तसेच तेलंगणातील जनतेनेही काँग्रेसच्या गॅरंटीवर विश्वास टाकला. आता देशभरातील जनतेसाठी काँग्रेसने ५ न्याय व २५ गॅरंटी दिल्या आहेत, शेतकऱ्यांना कर्जमाफी, एमएसपीचा कायदा, जीएसटीमुक्त शेती, तरुणांसाठी ३० लाख रिक्त जागा भरणे, शिक्षित तरुणांना प्रशिक्षण व वर्षाला १ लाख रुपये, गरिब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देण्याची गॅरंटी देण्यात आली आहे. भाजपाचा अपप्रचार खोडून काढणे व काँग्रेसच्या गॅरंटीचा प्रचार व प्रसार करण्यावर भर दिला जाणार आहे.

**संजय निरुपम यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई :** पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, माजी खासदार संजय निरुपम यांचे स्टार प्रचारकाच्या यादीत नाव होते पण त्यांनी पक्षविरोधी वक्तव्य केले असून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे, असे पटोले यांनी सांगितले .

भिवंडी, सांगली व मुंबईतील जागांसाठी काँग्रेस आजही आग्रही आहे. यासाठी सामोपचाराने व चर्चेतून मार्ग काढला जाईल. भाजपाला सत्तेतून हद्दपार करणे हाच इंडिया आघाडीचा निर्धार आहे त्यासाठी सर्व मित्र पक्षांनी काम केले पाहिजे. जनतेनेच ही निवडणुक हातात घेतली असून इंडिया आघाडीवर जनतेचा विश्वास वाढलेला आहे असेही नाना पटोले म्हणाले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, प्रचार समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज चव्हाण, पब्लिसिटी कमिटीचे अध्यक्ष विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज बंटी पाटील, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री अस्लम शेख, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे नेते व समित्यांचे सदस्य उपस्थित होते.

### चर्चेतील बातमी

# डॉ.आंबेडकरांचे स्वप्न मोदी सरकारने पूर्ण केले

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** देशातील वंचित, गरिब, आदिवासी, शेतकरी यांचा विकास करण्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पंतप्रधान मोदी यांनी साकार केले. मोदी सरकार यापुढच्या काळातही वंचितांना न्याय देईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी अकोला येथे केले. अकोला लोकसभा मतदारसंघातील भाजपा- महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना झालेल्या 'विजय संकल्प सभेत' श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अकोल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील,भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, आ. हरीश पिंपळे, आ.श्वेता महाले आदी उपस्थित होते. वंचितांच्या कल्याणासाठी यापुढेही सरकारी योजनांचा पैसा प्राधान्याने खर्च केला जाईल. यावेळची निवडणूक ही जनतेची निवडणूक आहे. जनतेचा पंतप्रधान पुन्हा सत्तेवर आणण्यासाठी अनुप धोत्रे यांना विजयी करा,असे आवाहनही श्री. फडणवीस यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात देशाचे संविधान सुरक्षित असल्याचे नमूद करत फडणवीस म्हणाले की, अस्तित्वाच्या भीतीमुळे संविधान बदलण्याविषयीचा अपप्रचार विरोधकांकडून केला जात आहे. पंतप्रधान मोदी यांना धर्मग्रंथापेक्षाही संविधान महत्त्वाचे आहे.

# हेमंत पाटील यांचे तिकीट कापले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाने काही दिवसांपूर्वीच लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. शिंदे गटाने एकूण आठ उमेदवारांची नावे जाहीर केली होती. हिंगोलीमधून हेमंत पाटील यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर हेमंत पाटील यांनी मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू केला होता. मात्र आठवड्याभरातच आता हेमंत पाटील यांचे नाव मागे घेण्याची वेळ शिंदे गटावर आली आहे. त्यांच्याऐवजी आता बाबूराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे २६ एप्रिल रोजी हिंगोली मतदारसंघाचे मतदान पार पडणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची ४ एप्रिल ही शेवटची मुदत आहे. अर्ज भरण्याची मुदत संपण्याच्या एक दिवस आधी ठरलेला उमेदवार मागे घ्यावा लागला आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार खासदार हेमंत पाटील यांची उमेदवारी बदलण्यासंदर्भात भाजपाकडून दबावतंत्र सुरू झाल्यानंतर खासदार पाटील यांच्या समर्थनार्थ २०० गाड्या भरून कार्यकर्ते मुंबईला आणले गेले होते. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी हेमंत पाटील डेरेदाखल झाले.

# घरोघरी पोहचू द्या मतदानाचा संदेश : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** मतदार जागृतीसाठी 'स्वीप' अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळांमधून दि.१० या एकाच दिवशी व एकाच वेळी सकाळी ७ ते ८ या वेळेत प्रभात फेरीचे आयोजन करावे. तसेच मतदानाची गुढी उभारुन गावागावातून मतदानाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषवाक्याच्या माध्यमातून जाणीव जागृती करुन घरोघरी मतदानाचा संदेश पोहोचवा,असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी सुदर्शन तुपे, उपायुक्त अंकुश पांढरे, शिक्षण अधिकारी प्राथमिक जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी माध्यमिक एम. के. देशमुख यांच्यासह सर्व विधानसभा मतदारसंघनिहाय 'स्वीप' कक्षात नियुक्त अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, दि.१० एप्रिल रोजी सर्व शाळांनी आपापल्या गावात प्रभात फेरी काढून मतदार जागृतीचा संदेश द्यावा. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व सांगणारा मजकूर हस्ताक्षर स्पर्धेसाठी देण्यात यावा. स्पर्धेत प्रथम, द्वितीय ,तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना दि.१ मे यादिवशी पारितोषिक वितरण करण्यात यावे. संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना एक पत्र वाचून दाखवावे व यामध्ये मतदान करण्याविषयीचे आवाहन असावे. दि.१ मे रोजी शालेय निकालपत्रा सोबत हे पत्र वितरीत करावे. हे पत्र विद्यार्थीनी घरी पालकांना वाचून दाखववावे. महिला बचत गटांची मदत घेवून महिला मतदारांचे प्रमाण वाढवण्यासाठी काम करावे. अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, शिक्षक असे शासन यंत्रणेचे काम करणारे सर्व घटक यांना आवाहन करण्यात यावे.

शहरातील मोठ्या महाविद्यालयांमध्ये मतदान जाणीव जागृती विषयी मोक्याच्या जागी बॅनर्स लावावे. लोकशाहीच्या महत्त्व विषयी विविध तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे.बचत गटांनी गाव, तालुका. जिल्हास्तरावर महिलांच्या माध्यमातुन मतदानाचे जागृती करावी. गुढीपाडवा, ईद यासारख्या विविध सणांच्या निमित्ताने शुभेच्छा देतांना लोकांना मतदानाचे महत्त्व सांगावे व लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यात सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

# भोकर उपजिल्हा रुग्णालयाचे काम अधिकाऱ्यांनी रोखले

## निविदेस दिली बगल; अधिकारी व कंत्राटदारांची मिलीभगत

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असून रूग्णाची गैरसोय होऊ नये म्हणून शहरात शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. निविदास बगल देऊन अधिकारी व कंत्राटदाराच्या मिलीभगत मुळे पायाभरणीतच अनेक त्रुटी आढळून आल्याने एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर काम रोखले आहे. संबंधितावर काय कार्यवाही होणार याकडे लक्ष लागून आहे.

शहरात ग्रामीण रुग्णालय कार्यरत असून तीथे अद्यावत सोयीसुविधा नसल्याने नव्याने शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व्हावे अशी जनतेची मागणी होती. याची दखल घेऊन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शंभर खटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी मिळवून घेतली, रुग्णालयासाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला होता तो मार्गी लागला आहे. महिन्याभरापूर्वी बांधकामाला प्रारंभ करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणावर यंत्रसामग्री आणून खोदकाम सुरू करण्यात आले. काही गाळे भरण्याचे काम देखील सुरू आहे. गजाळी वापरून बीम देखील उभे करण्यात आले आहेत.

मंजूर झालेले उपजिल्हा रुग्णालय हे शंभर खाटांचे असून तीन मजली इमारत उभारण्यात येणार आहे ४० कोटीहुन अधिक खर्च या कामावर होणार असून अत्याधुनिक सुविधा असणारी सुसज्ज



इमारत इथे साकारल्या जाणार आहे,महिनाभरापूर्वी सदर ईमारतीच्या कामासाठी सुरुवात करण्यात आली. जमीन लेवल करून पाया भरणीचे बीम खोदकाम करण्यात आले. गजाळी सिमेंट वापरून काही खड्डे देखील भरण्यात आले होते. रात्रंदिवस काम जोमाने केले जात आहे. यासाठी लागणारे आवश्यक साहित्य खरेदी करण्यात आली.

अतिशय सुसज्ज आणि अत्याधुनिक सुविधा असलेली तीन मजली इमारत भविष्यात दीर्घकाळ टिकावी म्हणून खोलीचे बीम खोदण्यात आले गजाळी सिमेंट वापरून काही बीम भरण्यात देखील आले मात्र सदर बीमची खोली व रुंदी कमी असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्याने काम बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पायाभरणीच चुकीच्या पद्धतीने होत असेल तर इमारतीचे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर काय कार्यवाही होणार याकडे लक्ष लागून आहे.


## मोईत्रांना झटका

आधुनिक केसरी

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि बडतर्फ खासदार महुआ मोईत्रा यांच्या विरोधात ईडीने प्रश्नांच्या बदल्यात पैसे मागितल्याप्रकरणी मनी लाँडरिंगचा गुन्हा दाखल केला आहे. कॅश फॉर क्वेरी प्रकरणावरील नीतिमत्ता समितीचा अहवाल आल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोइत्रा यांना लोकसभेतून बडतर्फ करण्यात आले होते. मोइत्रा यांनी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्याकडून रोख रक्कम आणि महागड्या भेटवस्तू घेतल्या होत्या, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. महुआ मोइत्रा आता पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात उतरल्या आहेत. टीएमसीने त्यांना पश्चिम बंगालमधील कृष्णानगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. मात्र, यानंतर मोईत्रा यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत.

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने दोन दिवसांपूर्वीच महुआ मोईत्रा यांच्याविरोधात एफआयआर दाखल केला होता. ईडीने महुआ मोईत्रा यांना चौकशीसाठी दिल्ली कार्यालयात हजर राहण्याचे समन्स बजावले होते. मात्र समन्सला कोणतेही उत्तर न दिल्यामुळे त्यांच्याविरोधात खटला दाखल करण्यात आला आहे. फेमा कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी आता महुआ मोईत्राची चौकशी होणार आहे. बडतर्फ खासदार महुआ मोईत्रा यांना तृणमूल काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा क्रिष्णानगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. व्यावसायिक हिरानंदानी यांच्याकडून लोकसभेत प्रश्न विचारण्याच्या बदलण्यात पैसे आणि भेटवस्तू स्वीकारल्याबद्दल त्यांना दोषी ठरविण्यात आले होते. व्यावसायिकाने महुआ मोईत्रा यांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून अदाणी समूहाच्या विरोधात प्रश्न विचारले. वकील जय अनंत देहाद्री यांनी सर्वप्रथम हे प्रकरण उजेडात आणले. त्यानंतर भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत हा मुंडा मांडून त्याबद्दल लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे टीकचा मांडला. महुआ मोईत्रा यांनी मात्र आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले. मी अदाणी समूहाच्या विरोधात प्रश्न विचारला म्हणून मला लक्ष्य केले जात आहे, असेही त्या म्हणाल्या. निवडणुकीतील माझा विजयच हा मला दिलेला त्रास आणि छळवणुकीवरचे उत्तर असेल, असे सांगून लोकसभेला आपला विजय होईल, असे मोईत्रा यांनी सांगितले. क्रिष्णानगर येथे चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी मतदान होणार आहे.

## मी @ ७५



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**आज आयुष्याच्या ७५ व्या वर्षी मागे वळून बघताना, आयुष्याची कॅसेट रिवाइंड करून ऐकताना मनात कृतज्ञतेचा भाव आहे. प्रचंड समाधान,आनंदाचा भाव आहे. मला माझ्या आयुष्याने, अवती भवती च्या समाजाने सारे काही भरभरुन दिले. अपेक्षेपेक्षा जास्त, क्वचित योग्यते पेक्षा जास्त दिले! त्यामुळे आज कुणाकडे कसलीही तक्रार नाही.काहीतरी राहून गेल्याची रुखरुख नाही. कुणावर राग नाही.आहे फक्त कृतज्ञ भाव.. सर्वात आधी मला माझ्या जन्म दात्या आई वडिलांचे आभार मानले पाहिजेत.मी दीड वर्षाचा असताना त्यांनी मला माझ्या आजीच्या ( डिलांची आई) झोळीत टाकले.तेव्हापासून माझे संगोपन,शिक्षण,पालन पोषण सारे या आजीने अन् दोन काकांनी केले.**

आज मी जो काही आहे त्याचे बरेचसे श्रेय या आजी काकांना जाते. तसेच मला त्याच्याकडे पाठविणाऱ्या आई वडिलांकडे देखील जाते.एरवी इतर भावा बहिणीं सारखे खेड्या पाड्यात माझ्या शिक्षणाचे हाल झाले असते.

आजी हीच खऱ्या अर्थाने माझी आई झाली.त्याकाळी शिक्षण आजच्या सारखे महागडे नसले तरी नगर पालिकेच्या शाळेत मास्तर असणाऱ्या काकासाठी महिन्याच्या खर्चाची जुळणी करणे तितके सोपे नव्हते. पण सारे निभावले.कुणी कुठून मदतीला पुढे आले,वेळ निभावून गेले देव जाणे.. या सर्वांचा मी ऋणी आहे.हे कर्ज फिटणारे नाही.हे ओझे वाहण्यातच गम्मत आहे. माझे मित्र,माझे शाळा कॉलेजातले शिक्षक,आय आय टी चे प्राध्यापक, मार्गदर्शक,पुढे उस्मानिया विद्यापीठातील सहकारी प्राध्यापक,यांच्याकडून खूप काही शिकता आले.आयुष्याची जडण घडण,संस्कार म्हणतात ती सारी यांचीच देणगी.शिक्षकी पेशा खऱ्या अर्थाने ७४ साली सुरू झाला असला तरी माझे शिकवणे मी प्रायमरी, मिडल स्कूल मध्ये असतानाच सुरू झाले.कारण मीच मला शिकवीत असे! तीच माझी अभ्यास करण्याची पद्धत होती. काका शिक्षक असल्याने घरी खडू डस्तर असायचेच. दारे खिडक्या याचा फळा म्हणून उपयोग व्हायचा. काकाच्या शाळेतले घरी आणलेले त्याच्या विद्यार्थ्यांचे पेपर देखील मीच तपासत असे! मास्तर की अशी लहान पणा पासून रक्तात भिनली. ती अजूनही टिकून आहे. शेवटच्या श्वासापर्यंत टिकून राहणार आहे! उंच सखल वाटा, खाच खळगे हे प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असतात.मीही अपयश,न केलेल्या चुकाचे दुष्परिणाम,आकस्मिक संकटे हे सारे भोगले आहे. स्वतः लेखक असूनही अवती भवतीची,अगदी जवळची माणसे मला नीट ओळखता आली नाहीत. माझे अंदाज चुकले.माणसाची पारख चुकली. त्याचे बरे वाईट परिणाम देखील भोगावे लागले.पण त्याबद्दल मुळीच तक्रार नाही. काळा बरोबर खूप काही बदल घडताहेत. नात्याचे अर्थ बदलताहेत. पूर्वीचा ओलावा, जिव्हाळा राहिला नाही नात्यात. व्यावहारिक कोरडेपणा उरलाय फक्त. माणसाच्या भाव भावनाची त्रिज्या संकुचित झाली आहे. मी, माझे, असे लहानसे वर्तुळ प्रत्येकाचे..त्यात इतरांना सहजासहजी प्रवेश नाही.स्पर्शात ओल नाही.बोलण्यात गोडवा उरला नाही. निराशेने ग्रस्त मनाचा आक्रस्ताळेपणा तेव्हढा वाढला आहे.तुमची किंमत तुम्ही काय देता,तुमचा फायदा काय,यावरच अवलंबून राहणार..

कुटुंबातले तणाव अपेक्षेपोटी वाढताहेत.. कुठे कोण कधी तुमच्या वागण्या बोलण्याने नाराज होईल सांगता येत नाही.सावधगिरी किती बाळगायची? त्याचेच दडपण आहे.



ही कुणा एकट्याची नव्हे, सर्व व्यापी समस्या आहे. आपल्याला याच रिंगणात फिरायचे आहे. कुणाचीच सुटका नाही. मी हे सारे स्वीकारत वाटचाल केली.करतो आहे. मी स्वतःला भाग्यवान समजतो. माझ्या कुटुंबाने मला भरभरुन साथ दिली. माझ्यासाठी प्रसंगी त्याग केला.मला समजून घेतले.कुटुंबानेच नव्हे तर माझे मित्र,स्नेही,ज्येष्ठ कनिष्ठ सहकारी साऱ्यानी माझ्या वाटचालीत मदत केली. प्रोत्साहन दिले.भरभरुन आशीर्वाद दिलेत. त्या बळा वर मी एका पाठोपाठ एक शिखर काबीज करीत गेलो.माझ्या शिक्षकाकडूनच नव्हे तर विद्यार्थ्यांकडून देखील मी बरेच काही शिकलो.अजूनही शिकतोच आहे. किंबुहुना आज जे शिकतो, शिकलो ते आधीच शिकलो असतो तर माझे शिकवणे अधिक प्रगल्भ झाले असते असे आता वाटते!

ज्या संस्थेत मी पदवी घेतली त्याच संस्थेचा प्रमुख होण्याचे भाग्य मला लाभले. निवृत्ती नंतर महाराष्ट्रात काहीतरी योगदान देण्याची राहून गेलेली इच्छा कुलगुरू झाल्याने पूर्ण झाली.हे अनुभव काही कडू काही गोड असे असले तरी,एकंदरीत समृद्ध करणारे,लक्षात राहणारे, योगदान दिल्याचे समाधान प्रदान करणारे होते.एका वेगळ्या जगाची ओळख करून देणारे होते.कडू गोड असे म्हंटले तरी कडू कमी अन् गोडच जास्त होते.माझ्या साठीच नव्हे तर पूर्ण कुटुंबासाठी..

आता आयुष्याच्या शेवटी राहून गेले,असे काहीही नाही.कसलीही इच्छा उरली नाही. एक लेखक या नात्याने स्वतःचा असा एक निवडक वाचक वर्ग निर्माण करता आला.माझ्या लेखनावर प्रेम करणारे कोण कोण,कुठे कुठे,किती किती आहेत हे पत्राने, फोन ने कळते तेव्हा लेखनाचे सार्थक झाल्याचे प्रचंड समाधान लाभते. एकीकडे इंजिनियरिंग चे अध्ययन, अध्यापन, संशोधन, अन् दुसरीकडे मराठी साहित्यातली मुशाफिरी हे सगळे माझ्या हातून कसे घडले याचे मलाच आश्चर्य वाटते! कडक शिस्तीचा असूनही एकीकडे विद्यार्थ्यांचे प्रेम अन् प्रचंड आदर मला मिळाला.तसेच मोजकेच साहित्य लिहूनही वाचकाचा अपार लोभ देखील..तसेच संपूर्ण हस्तलिखित हाती नसून सुध्दा क्रमशः दोन वर्षे महा कादंबरी प्रकाशित करणारे विश्वासू प्रकाशक देखील मला लाभले. आकाशवाणी साठी माझ्या भाव गीतांना चाली देणारे, गाणारे तेलुगू संगीतकार देखील मला लाभले. आणखीन काय हवे? केवळ आपल्याला आनंद देते ते खरे यश नव्हे उलट ज्या यशाने केवळ तुम्हालाच नव्हे तर इतरांना तुमच्या पेक्षा जास्त आनंद होतो ते खरे अस्सल यश म्हणता येईल. माझ्या यशाने दुसऱ्यांनाही आनंद देण्यात मला थोडेफार यश मिळाले हे माझे भाग्य. हा सिलसिला शेवटच्या श्वासापर्यंत अन् त्यानंतरही चालू रहावा म्हणून मी देहदान,अवयव दान करण्याचे ठरविले आहे.आपल्या देहाचा, अवयवाचा गरजूंना उपयोग व्हावा, मेडिकलच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी उपयोग व्हावा अशी माझी इच्छा आहे. गेल्यानंतर कसलेही संस्कार,विधी नको आहेत. ज्यांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केले, माझ्या चुका मोठ्या मनाने पदरात घातल्या त्या सर्व आप्तेष्टांचा, मित्रांचा,सहकाऱ्यांचा, कुटुंबीयांचा मी ऋणी आहे. कृतज्ञ आहे. यापुढेही हा स्नेह, प्रेम, जिव्हाळा असाच कायम रहावा अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

## वाढता हट्टीपणा मुलांच्या भविष्यासाठी घातक



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जिद्द आणि हट्ट ह्या परस्परविरोधी परिणाम देणारया बाबी आहेत. जिद्द जीवन घडवते तर हट्ट जीवन बिघडतो आणि सध्या विद्यमान परस्थिती मध्ये मुलां मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात हट्टीपणा वाढीस लागला आहे हि भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे.कुटुंब संस्था हि संस्कारांची पाठशाळा होती पण आज कुटुंब हिच संस्था मोडकळीस आली आणि कुटुंब हि संकल्पना सिमित झाल्याने त्याचे अनेक दुष्परिणाम सुद्धा आपल्याला दिसत आहेत.पण सध्य परिस्थिती मध्ये आपणं जे कुटुंब समजतो त्या कुटुंबांच्या पातळीवर जरी मुलांच्या सोबत मजबूत संवाद ठेवला तर नक्कीच चांगले परिणाम दिसतील.या मध्ये शंका नाही. सिनेमांच्या माध्यमातून नकारात्मक अहितकारक बाबींचा कोमल बाल मनावर होणारा प्रभाव इतका वाढत चाललेला आहे कि परीणाम स्वरूप बाल वयात प्रचंड गुन्हेगारी वाढत आहे.**

सोशल नेटवर्कर वेगवेगळ्या प्रकारच्या विघातक बाबींचा उच्छाद मांडलाय त्याचे परिणाम खुप मोठ्या प्रमाणात लहान मुलांच्या मनावर होऊन होत आहे.चांगले विचार कमी आणि वयात जास्तीत जास्त वाईट विचार मनावर कोरले जाण्यासाठी पुरक वातावरण आपोआप तयार होत असल्याने समाजिक पातळीवर असो अथवा कौटुंबिक पातळीवर याचे विघातक परिणाम समोर येत आहेत.लहान लहान मुलं युवा अवस्थेतील तरूण हे दिवसेंदिवस हट्टी होत आहेत.याची कारण देखिल आपल्या आजूबाजूलाच आहेत. आपण या मुळ कराणांना प्रचंड खतपाणी घालतोय.हे खतपाणी घालण बंद करणं हितकारक ठरेल.मुलांचा जास्तीत जास्त वेळ हा पालकांच्या सोबत संवाद,वेगवेगळ्या धार्मिक कथा,रामायण, भगवत गीता तसंच मैदानी खेळ वेगवेगळ्या महापुरूषांची प्रेरणादायी पुस्तक सहज पणे हसत खेळत वाचण्यासाठी कलात्मक पद्धतीने पालकांनी नियोजन करणं गरजेचं आहे. पालकांनी मुलांना विश्वासात घेणं वेगळ्या पद्धतीने त्यांच्यावर आपला प्रभाव निर्माण करत संवाद वाढवत मुलं आपल्या आज्ञेबाहेर जाणार नाहीत याची काळजी दक्षता घेतली तर नक्कीच या मध्ये चांगल्या पद्धतीने यश मिळेल.लहान वयात मुलं कोमल असतात आणि बहुतांश बुद्धीचा विकास हा युवक अवस्थेत होत असतो.ज्या वेळेत चांगल्या बाबी घडतात त्याच वेळी वाईट बाबी पण घडत असतात आणि याच वाईट बाबी विषयी आपण सचेत जागरूक असल पाहिजे.आपली जागरूकता हाच आपला बचाव आहे.जीवन जितकं सरळ सोपं आहे तितकंच कठीण आहे. दिवसेंदिवस जसा जसा तंत्रज्ञान विकास होत आहे.तसं तसं सामाजिक पातळीवर मात्र वेगवेगळ्या समस्या डोकं वर काढत चिंतेत भर घालत आहेत.मुलांच हित व्हावं अथवा आयुष्य घडाव हि सर्वसाधारण पणे प्रत्येक पालकाची इच्छा असते .पण सध्या मुलकाचा आळसीपणा वाढला आहे.चैन युक्त जीवन आणि चंगळवाद फोफावत चालला असल्याने मुलं पण या विळख्यात अडकत चालली आहेत.मग वेगळ्या चैनेच्या वस्तु अनेक भौतिक सुविधा, मोबाईल टिव्ही,आजुन काही काही या सगळ्या मध्ये कसरत व्यायाम नको आहे,अभ्यास नियोजनबद्ध जीवन शौली नको आहे धार्मिक आचरण अथवा सुसंकृत जीवनाची मार्गदर्शक तत्वे फार कोणीही आचरणात आणायला तयार नाही.मग वेगवेगळ्या सिनेमातील खुखंर क्षण चित्र पाहून उत्कृष्ट असे गुण कसे काय प्रगट होतील.मुळात आपण आपल्या मेंदूत काय टाकतो हे खुप महत्वाचं आहे.चांगल्या बाबी आपल्या आयुष्यात असल्या पाहिजेत पण आपण चांगल्या बाबीला नाही तर वाईट बांबीना थारा देतो आणि आयुष्याचा बोरया वाजवुन घेतो.सध्या च्या तरूण पिढी मध्ये अंहकार राग जास्त नक्कीच आहे याबद्दल दुमत नाही.पण लहान पणापासून हट्टीपणा हा बळावत चाललाय आणि तो पुढे जाऊन विदारक रूप धारण करतोय.याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम पालक आई वडील यांनाच भोगावे लागतात.मग हा हट्टीपणा एकाएकी वाढत नाही.हळुहळु हा वाढत असताना आपण वेळीच लक्ष दिलं पाहिजे.आणि संवाद वाढवला पाहिजे. जिद्द वेगळी जिद्दीपणा वेगळा आणि हट्टीपणा वेगळा असतो.जिद्द जिद्दीपणा आयुष्य घडवते.हट्टीपणा आयुष्य उध्वस्त करतो. आयुष्य उध्वस्त करणारा हट्टीपणा सध्या मुलांच्या मध्ये दिवसेंदिवस वाढीस लागला आहे हि पालकांच्या साठी चिंतेची बाब असली तरी चिंता करण हा अंतिम उपाय नाही तर त्यावर योग्य असा उपाय काढता आला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कुठल्याही एका कवीला, कवितेला विजेता ठरवता येत नाही

## डॉ. अतुल नाईक यांचे प्रतिपादन




आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कवितांमधून स्पर्धाच नसते, कोणतीही कविता ही विजेती किंवा उपविजेती नसते. प्रत्येक कवितेचे एक विशिष्ट स्थान असते. त्यामुळे कोणी एक विजेता व बाकी सर्व नापास, असे कोणीही समजू नये. तुम्ही सर्वच विजेता आहात, असे प्रतिपादन एऑन प्लेचे डायरेक्टर डॉ. अतुल नाईक यांनी केले. विश्वव्यापी मराठी दैनिक आधुनिक केसरी यू-ट्यूब चॅनल व एऑन प्ले आयोजित 'महाराष्ट्राचा महाकवी -2024' या आनलाईन काव्यवाचन स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा 28 मार्च रोजी कुलस्वामिनी मंगल कार्यालयात संपन्न झाला. तसेच स्पर्धेतील सहभागी कवींना सन्मानपत्र देण्यात आले. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अतुल नाईक बोलत होते. व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, कवयित्री संजीवनी तडेगावकर आणि महाराष्ट्राचा महाकवी ही स्पर्धा जिंकणारे विजेते नामदेवराव चोथे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. अतुल नाईक म्हणाले की,कुठल्याही एका कवीला व त्याच्या कवितेला विजेता ठरवता येत नाही. त्याचे कारण असे की, ज्या भावनेला आपण कथन करत आहोत. जो कथ्य विषय आहे, त्याची उत्कटता त्याच्यामध्ये सामावता आली तर त्याची कविता एक नंबरच आहे. मी तुम्हाला एक गोष्ट सांगू शकतो की एक नंबरच्या दोनशेपैकी एकशे नव्यावनाव कविता मला आवडल्या. कवितेची सुरुवात महर्षी वाल्मिकी यांनी केली. त्यांनी रामायण या ग्रंथातून श्लोकांच्या रूपाने संपूर्ण रामायण लिहिले, नंतर अनेक संत साहित्य झाले, रामदास स्वामी यांनी श्लोकांतून उपदेश केले तर संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरीतून जीवनाचा सर्व सार मांडला. अनेक संतांनी आपल्या रचना वेगवेगळ्या साहित्यप्रकारांत मांडल्या. अनेक शायरांनी आपल्या शायरीद्वारे अनेकांना प्रेमात पाडले. यावेळी डॉ. अतुल नाईक यांनी अनेक संस्कृत श्लोकातून कवितेची महानता उदाहरणांसह स्पष्ट केली.

# धर्माबादेत मिरचीला तब्बल सात हजार ते अठरा हजार रुपये प्रतिक्विंटल भाव!


आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथील मार्केट यार्डात मिरचीची आवक चालू झाली असून गतवर्षापेक्षा ती मंदावली असल्याचे मार्केट यार्डात बोलल्या जात आहे. काल झालेल्या मिरचीच्या बीट मध्ये प्रति प्रमाणे तब्बल सात हजार ते अठरा हजार तीनशे रुपये प्रतिक्विंटल मिरचीला भाव मिळाला आहे.

दिनांक 01-04-2024 रोजी धर्माबाद मार्केट यार्डात 730 पोते मिरचीची आवक झाली होती. तर भाव मिरचीच्या वेगवेगळ्या जाती प्रजाती व प्रति प्रमाणे सात हजार ते तब्बल 18 हजार 300 रुपये क्विंटलवर गेला.

गतवर्षीच्या तुलनेत मात्र धर्माबाद मार्केट यार्डात मिरचीची आवक कमालीची घटत असल्याचे धक्कादायक चित्र दिसत असून मिरचीच्या लागवडीकडे धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांनी सपशेल दुर्लक्ष केले असून तेलंगाना व आंध्र प्रदेशच्या सीमा वरती गावातूनच धर्माबाद मध्ये मिरचीची आवक होत असल्याचे स्पष्ट दिसत आहेत.






# शरणपूर वृद्धाश्रमात फळांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** खडका रस्त्यावर लोक सहभागातून सुरू असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमातील आजी आजोबांना फळांचे वाटप करून साठे परिवाराच्या वतीने आईच्या स्मृती दिनी अभिवादन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा सरचिटणीस दीपकदादा साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. नेवासा तालुका पास्टर फेलोशिपचे अध्यक्ष पास्टर प्रकाश चक्रनारायण हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी दीपकदादा साठे यांच्या मातोश्री श्रीमती लताबाई साठे यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृद्धाश्रमातील आजी आजोबा समान असलेल्या वृद्धांना फळांचे वाटप करण्यात आले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी पास्टर फेलोशिपचे सेक्रेटरी पास्टर सदाशिव चव्हाण, आदित्य चक्रनारायण, देवा चक्रनारायण, परेश चक्रनारायण, अनिल चांदणे, अक्षय कनगरे, अभिजित साळवे, भाऊसाहेब पवार, नानासाहेब ईस्ते, वृध्दाश्रम चालक रावसाहेब मगर, व्यवस्थापक संतोष मगर, सौ.ज्योतीताई मगर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# हिंदू समाजातील शक्तीच्या जोरावर हिंदू राष्ट्र टिकून : मिलिंद परांडे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** हिंदू समाजातील शक्तीच्या जोरावर हिंदू राष्ट्र टिकून आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे अखिल भारतीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी केले. विश्व हिंदू परिषद अहिल्यानगर विभाग बैठक नेवासा येथे संपन्न झाली. समर्थ सद्गुरु किसनगिरीजी बाबा पुण्यतिथी निमित्त विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे यांनी बाबाजी यांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी महंत गुरूवर्य श्री भास्करगीरीजी महाराज व महंत स्वामी प्रकाशनंदगिरीजी महाराज यांची भेट घेवुन आशीर्वाद घेतले. त्यावेळी संस्थानच्या वतीने त्याचा सन्मान करण्यात आला. मिलिंद परांडे यांनी म्हटले आहे की हिंदू मंदिरांच्या कामकाजात प्रत्येक जाती आणि समुदायाने सहभाग घेतला पाहिजे. विहिंपच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. विहिंप संघटनेच्या विस्तारासोबत सामाजिक समरसता आणि सेवेच्या कामावर भर देणार आहे. जन्माष्टमीपर्यंत आपले कार्य एक लाख ठिकाणी नेण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. बजरंग दलाची शौर्य जागरण यात्रा आणि राम मंदिर गृह संपर्क अभियान यामुळे संघटनेचा विस्तार होण्यास मदत झाली आहे. हिंदू मंदिरे हिंदू समाजानेच चालवली पाहिजेत. मिलिंद परांडे म्हणाले की, तामिळनाडू राज्यात वीस हजार पुजारी प्रशिक्षण व भारतात पहिल्यांदा महिला पुजारी प्रशिक्षण नुकतेच महाराष्ट्रात संपन्न झाले. सध्या आमचे देशात सेवाकार्य पाचहजार ठिकाणी सुरू आहे. प्रभू राम आयुष्यभर अन्यायाविरुद्ध लढत राहिले. त्यांनी जनजागृती केली. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची हिंमत प्रत्येकामध्ये असली पाहिजे.

विहिंपचे परांडे म्हणाले की प्रभू रामाच्या जीवनात सामाजिक समरसता आहे. ते आदिवासी भागात आणि वनवासी समाजात गेले. त्यांनी प्रत्येक जाती, समाजातील लोकांना आपल्या हृदयात घेतले. हा हिंदूंचा दृष्टिकोन आहे. त्यांनी कर्तव्याला प्राधान्य दिले. रामजींचे कर्तव्य जीवन कठोर होते. त्याच्या आयुष्यात कोणताही चमत्कार नाही. माणसाने आपले जीवन कसे जगावे याचा आदर्श त्यांनी मांडला. यावेळी संघटन मंत्री अनिरुद्ध पंडित, प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, प्रांत विश्वस्त प्रभाकर शिंदे, विभाग मंत्री सुनील खिस्ती, प्रखंड मंत्री प्रशांत बहिरट जिल्हा मंत्री श्रीकांत नळकांडे, सहमंत्री विशाल वाकचौरे, कुणाल भंडारी अविनाश काळे विश्वनाथ नानेकर गजेन्द्र सोनवणे आदींची उपस्थिती होती.






# आबासाहेबांनी सुरू केलेल्या वसतिगृहामुळेच माझ्या जीवनाचे सोने झाले : भाऊराव वीर

आधुनिक केसरी न्यूज

**नरहरी शहाणे**

**नेवासा :** आबासाहेबांनी सुरू केलेल्या वसतीगृहामध्येच शिक्षण घेऊन मी आज क्रीडा अधिकारी म्हणून आपल्यासमोर उभा आहे असे प्रतिपादन क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांनी एफ. डी.एल. शिक्षण संस्थेस शासनाच्या मिळालेल्या सर्वोच्च संस्था पुरस्काराच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी केले.

आबासाहेब काकडे विद्यालय,शेवगाव या ठिकाणी आज दि फ्रेंडस् ऑफ दि डिप्रेस्ड लीग, शेवगाव या संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक, न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सर्वोच्च शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर संस्थेच्या वसतिगृहाचे माजी विद्यार्थी तथा क्रीडा अधिकारी भाऊराव वीरसाहेब होते .तसेच व्यासपीठावर संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.लक्ष्मण बिटाळ, प्राचार्य संपतराव दसपुते,संस्थेचे शैक्षणिक विभागाचे सहप्रमुख अशोक आहेर ,जनशक्ती विकास आघाडीचे जगन्नाथ दादा गावडे, देवराव दारकुंडे, राजेंद्र झरेकर, पत्रकार आलिम शेख, उपप्राचार्या श्रीमती रूपा खेडकर, उपमुख्याध्यापिका श्रीमती पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, हरिश्चंद्र मडके शिवाजी पोटभरे, संस्थेच्या वसतिगृहाच्या माजी अधिक्षिका मीरा गाढे, प्रतिभा उबाळे, मंदाकिनी पठाडे, पांडुरंग गाडेकर, विक्रम ढाकणे दिनकर ढाकणे, भाऊसाहेब शेळके, महारुद्र झिरपे, सोपान थोरात, सुरेश शेळके, अशोक केदार,विद्यालयाचे राष्ट्रीय खेळाडू आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात प्रा. लक्ष्मण बिटाळ बोलताना म्हणाले, की कर्मयोगी आबासाहेब काकडे व स्वर्गीय निर्मलाताई काकडे यांनी उभारलेल्या एफ .डी .एल. संस्थेच्या माध्यमातून गोरगरीब, दीन, दुबळे, अनाथ ,कष्टकरी, शेतकरी, ऊस तोडणी कामगार यांचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न केला. संस्थेकडून विविध वसतिगृहे व बालगृहे चालवली जातात. तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली आहे .एफ.डी. एल. संस्थेकडून नैसर्गिक आपत्तीत भरीव असे सामाजिक कार्य केले. १९३३ पासून संस्थेने केलेल्या सामाजिक, शैक्षणिक कार्यामुळेच शासनाचा हा सर्वोच्च पुरस्कार संस्थेला मिळाला असे सांगितले .कार्यक्रमाचे अध्यक्ष क्रीडा अधिकारी श्री. भाऊराव वीर आपल्या मनोगतात पुढे म्हणाले, की आबासाहेबांनी स्थापन केलेल्या संस्थेला आज ॲड .शिवाजीराव काकडे व सौ . हर्षदाताई काकडे यांनी यशाच्या शिखरापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे . संस्थेने केलेल्या विशेष सामाजिक कामगिरीमुळे शासनाकडून हा पुरस्कार मिळाला. वीर विद्यार्थ्यांना संदेश देताना म्हणाले, की भरपूर खेळ खेळा ,आनंदाने जीवन जगा तसेच आपले आई-वडील, गुरुजनांचे व संस्थेचे नाव मोठे करा .

सदर कार्यक्रम प्रसंगी संस्थेच्या वसतिगृहाच्या आजी - माजी अधिक्षकांचा तसेच विद्यालयाच्या राष्ट्रीय खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या लोकार्पण सोहळ्यानिमित्त संस्थेस मिळालेल्या पुरस्काराची तसेच विद्यालयाच्या राष्ट्रीय खेळाडूंची शेवगाव शहरातून सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# आई सृष्टीची देण, आई विश्वाचे मांगल्य!

आधुनिक केसरी

**भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, छत्रपती संभाजीनगर चे अध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांच्या 'माय तुहे किती आठव आठवू' या खंडकाव्याचे प्रकाशन आज 4 एप्रिल रोजी मठ पिंपळगाव (ता. अंबड, जि. जालना) येथे सकाळी 11 वाजता महंत बा. भो. शास्त्री यांच्या शुभहस्ते होत आहे. त्यानिमित्त हा पुस्तक परिचय...**

कविवर्य सर्जेराव पाटील जिगे यांच्या मायीच्या आठवांचे भावव्याकुळ प्राक्तन एक सृजनशील आत्मानुभूतीचे अनुबंध म्हणून हे खंडकाव्य वाचकाच्या मनाचा ठाव घेते.

आई सृष्टीची देण, आई विश्वाचे मांगल्य, आई काळजाचा ठावं, आई अमृताची खणी, आई ईश्वर देणगी, आई अनंताच्या कळा, आई बालकाच्या लीळा. आईच्या उदरात आपले भरण पोषण होताना आईने जे अनुवंश दिले हीच खरी आपल्या जगण्याची आत्मानुभूती आहे. ही सविनय समर्पक व आशयघन सत्य अभिव्यक्ती चिंतनगर्भ आशयसंपन्न 'माय तुहे किती आठव आठवू" अभंग वृतांचा रचनाबंध असलेली माय ही अखंड कविता आहे.

कवी हा आईचा आत्मस्वर आहे तो कितीदाही आळवू गेलो तरी त्या स्वरांनी मातृत्वाचा पाझरच शब्दांकित केला आहे. संत विवेकी महंत जेव्हा आचार विचारांचा जागर करतात तेव्हा आई ईश्वरी अंशाची देण आहे म्हणून त्रिकालाबाधित आईचे श्रेष्ठत्व हे कायमच राहिले आहे. आई म्हणजे रक्त मांसाची नाळ, आई म्हणजे श्वासची तारसप्तक चाळ, आई एक उदर मंदिराच्या गाभा-याची अखंड आत्म्याला तेवत ठेवणारी ज्योती.

डॉ. सर्जेराव पाटील जिगे सरांनी आपल्या सहृदयी आईच्या आठवांची ज्योत अखंड तेवत ठेवली आहे म्हणून इतकी समर्थ समृद्ध निर्लेप आई विषयीची आठवांची शिदोरी तीही अखंड/अभंगीत गायीली आहे. मुलगा शिकला. शिक्षण घेऊन गावा शिवाचे माय मातीचे आप्तस्वकीयांचे आभाळभर माया ममता व आशीर्वाद मिळवले. आईच्या कृपाळू कृषीप्रधान सावलीने शब्दांची ही आईच्या आठवांची पंचारती म्हणजे हे खंडकाव्य.

'अक्का मही माय, जगण्याचा श्वास।
मनाचा विश्वास, माय मही।।
अक्का मही माय, हृदयीचा भाव।
तीच महा देव, माय मही।।
(पृष्ठ ६)

मराठी साहित्याच्या प्रारंभ काळापासून आईच्या पावन स्मृतीचा उल्लेख केला जातो. आईच्या कष्टाचा डोलारा, जीवाला जीवाचं कोंदणं,मातृभक्ती म्हणजेचं संत विवेकी विचारांचे अधिष्ठान. आईच्या बाळंतवेणा ही कळ ज्या जिवाने पेलली ती देवालाही आवाहन करते की, बाळ वाचलं पाहिजे. मी जीव मुठीत घेऊन किती कळा देईल या कळीकाळाच्या कळेवर व नाळेवर अंतःकरणपूर्वक ही कविता अखंड झाली आहे. नाळ तोडली, रांजणाच्या ओलाव्याला पुरली. बाळ नाळ व नातं आयुष्याच्या अंतिम श्वासापर्यंत अखंडित राहिलं. ते सत्य वास्तव नाकारता येत नाही. लेकरू कोकरू, पाठरू व पाखरू मायेच्या पदरातून भुर्ऽ उडून जाईल. मोठं होईल. घरटं बांधील. पण मायेची उब अखिल सावली देणारी असल्याने ही कविता म्हणजे अनंताचा जिव्हाळा देणारी आहे. जशी ख्यातनाम कवी फ. मुं शिंदे यांची पाठराखणचं सांगते... आत्म्याचं आणि ईश्वराचं सम्यक दर्शन जिथं घडतं ते तीर्थक्षेत्र म्हणजे आई इतकी ती पूजनीय असते. तिची पूजा सर्व देवादिकांना पोहचते. ही दीर्घ रचना म्हणजे आरतीच आहे. कविवर्य मनस्वीपणे आईची अखंड आरती करत आहेत. आर्त भावनेतून केलेली ही मातृभक्ती आहे. म्हणून ही कविता एक मायेचा सागर आहे. अहोरात्र राबणारी कष्टणारी आई म्हणजे दैवत. आपल्या संचिताच्या अहेवपणासाठी, काळीपोत, पायी जोडव्याचं लेणं कुंकवासाठी आऊख मागणं. नातवाच्या रूपात आपल्याच लेकरावर आभाळमाया करणारी ही मातृभक्तीची कविता मन व्याकुळ करते. अख्ख्या शेतमळ्याच्या आबादाणीसाठी मायमातीच्या काळ्या विठ्ठलाची हरिपाठाने आराधना करणारी ही गावखेड्यातील माय एक साक्षात भक्तीचा मळा ही कविता देऊन जाते. माय घरादारासाठी, गावपांढरीतल्या पिकासाठी, गायगोठ्यातल्या मुक्या आसवांची ती काहिली होणारी माय मराठी कवितेत प्रथमच सर्जेराव जिगे यांनी अधोरेखित केली आहे. जसे "माय घेई कष्ट, गणगोतासाठी।
आधाराची काठी, संसाराच्या।।
मुखी घेई माय, विठू तुहं नाम।
करीतसे काम, दिन रात।।
(पृष्ठ ८७)

एक सृजनशील समृद्ध मनाने माय या अगाध शक्तीचे भगवंताच्या भक्तीचे पारायण म्हणजे ही अखंड कविता आहे. आपल्या मुलाने मायेचा हा कृपाळू कृपासिंधू, भवसिंधू भविष्याचा भवसागर उभा केला. माय किती आठवू आठवं. ज्या हाताने बोट धरले, लडिवाळ चालणे बोलणे शिकवले ते बोट अक्षरवाटेचे धन झाले. बाळं मी नेणता, माय तुझाच शब्दगुलाल घेऊन अखंड मायभक्तीचा आज कपाळी बुक्का लावून तुझा मी तुका झालो. 'सर जय राव' झालो. आई विनम्र भावनेची प्रार्थना




असते. त्रिकाल सत्यशील सत्यनिवेशी असते. म्हणून जेव्हा वेदना होतात तेव्हा एक तेजोनिधी शब्द निघतो तो आई असतो. आईची महती व सात्विक भक्तीची ही अखंड कविता आहे. ख्यातनाम कवयित्री अनुराधा पाटील मायेची सावली म्हणून लिहितात. "या उद्ध्वस्त होत चाललेल्या कृषिसंस्कृतीत जगण्या-या आई माईची व एकूणच स्त्रीची सर्वच पातळ्यांवर होणारी परवड शब्दातीत आहे. तरीही चिवटपणानं जगण्या-या इथल्या स्त्रीचं प्रयत्यकारी चिंतन चित्र. बाई आहे तशी आई पण आहे. या आई आणि बाईपणाची ही दीर्घ कविता तिचं चरित्रच आहे. आईपणाचा गौरव, तिचा संघर्ष, तिचं त्यागमय सोशिक जगणं कवीने भावोत्कट केलं आहे. या कवितांचा आत्मसंवाद हा एक संत परंपरेचा असल्याने मनव्याकुळ होऊन अभंगीत जावे, माय अनंत उपकाराचे पांग शब्दांकित व्हावे हा मनीचा भाव या कवितेने दिला आहे. जसे "आई बाप असता घरी, कशाला जाऊ पंढरपुरी".. माझे विठ्ठल रुखुमाई माझ्या मनाच्या कोंदणात आहे. "माय माझी भोळी, भोळा तिचा भाव, पंढरीचा राव, मायबाप" ही अमोघ मनाची निस्सीम भक्ती या कवितेने दिली आहे. सडा सारवण, शेतीभातीची अखंड कामे करताना आईच्या मुखात ही "हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा. पुण्याची गणना कोणं करी" या हरीच्या पाठाने ही कविता पुण्यवंत झाली आहे. जसे

चाले पायवाट, काट्या कुपाट्याची।
कुरूपं पायाची, जोपासली।।
जोपासलं दुःख, ओली ती पापणी।
काळजाचं पाणी, गोठलेलं।।

या भूमिजन लेकरांच्या वाणीला जे गवसलं ही मायेच्या कष्टस्वराची वेदना आहे. काट्याच्या आणीवरचा संसार करणारी कष्टणारी, पायात असंख्य कुरूपं घेऊन डोळ्याच्या पापणीला फक्त आसवांची वेदना देणारी.

दुःख कवटाळणे ही भूमिजनांची रीत नाही. काळीज गोठून कामाला लागणे ही सविनय भावना या कवितेने दिली आहे. या भूमिच्या भूमिजन लेकाचं मोठेपण नोंदवताना कवी लिहितो.

फेडीयेलं पांग, म्हणे ती बाळानं।
सांगे आनंदानं गणगोता।।
गणगोत तिने, सांभाळले खूप।
जगण्याची उब। ओवीतून।।

माय अनंत युगाची शिदोरी, जी सरतही नाही आणि उरतही नाही. मायेच्या चरणी सारी तीर्थे आहेत. ती मायेचे तीर्थक्षेत्र घडवणारी ही कविता. माय बापाच्या अनंत उपकाराची अभंग मांदीयाळी आठव आठवू माय तुहे किती. "माय बाप जगी। पवित्र ते तीर्थ, जीवनाला अर्थ प्राप्त झाला" हे सद्भाव या कवितेच्या परिप्रेक्ष्यातून आले आहेत. मानवी मूल्ये संस्कारित करताना माणूस म्हणून मी जन्माला आलो. भूमिजन ही संकल्पना नवनिर्मितीची तिफण पेरणीला येते तसं मायीविषयीची अभंगित ओवी या कवितेने दिली आहे. कवीचे चारीधाम शेतशिवार आहे. गावपांढरीत सर्वेश्वर आहेत. हे सारे माय मातीच्या ओलाव्याचे निर्लेप नितळ अभिव्यक्तीचे अभंग आहेत.

"उभा जन्म तिनं। सोशीयल्या कळा.
मनात उमाळा। दाबूनीया
काय मागू देवा। तू तर भिकारी
माय ही शिदोरी। जीवनाची" हे मनस्वी आराधनेचे आर्त भाव उमटत जातात. माय कळते, माय अकल्पित ईश्वरी होऊन जाते. मायेचा कान्हा, मांडीवरचं लेकरू होऊन तुटत जाणारा पान्हा फक्त आईलाच कळतो इतकी ओजस गोजिरी साजीरी ही कविता झाली आहे. 'अ' आई च्या स्वरांचे अभंगित स्वर या कवितेने दिले आहे.

आई नाही.. आई अंतःकरणी आहे. व्याकूळ भाव मनाला अस्वस्थ करतात "तुझ्या विना माय। होई सारं शून्य
तुहं मोल मान्य। तिन्ही लोका
अंतरात दाटे। तुह्या आठवणी
जीवनाची गाणी। गाऊ आता"

हे आईच्या आठवांचं गाणं जगण्याला उभारी देत राहिलं. संवाद थांबला असेल, अंतरीचे बोल कायमच राहतात. क्षणिक क्षणभर सारे हतबल होतात. काळ थांबतो. जगण्याची आस आई देते. कारण तिनेच उदरात श्वास दिला. दिस मावळतात. दिशा अंधारून येतात. पण आईची आठवांची रेषा अदम्य विश्वासाची दिशा दाखवते. म्हणून आई दिवा विझला असेल पण कवीच्या अंतरी तो तेवत राहतो.

अशी ही अखंडित मायेची ऊब देणारी कविता मनाला जगण्याची आत्मानुभूती देते. मायमाती मायीला आपल्या पदरात घेते. अखंडित तेवत राहते कवीच्या अक्षर अभंगात. गावपांढरीत मायेच्या हळव्या उबेला कवी व्याकुळ होतो. ही अशी "माय तुहे किती आठव आठवू."

कविवर्य मनस्वी शुभेच्छा. सृजन अभंग कविता. मायीचं कपाळभरून कुंकू अहेवाचं लेणं. नाकात नथ. गळाभरून सोन्याचे मनी. मायाळू भक्तीची सार्थ अभिमानी नजर हे सरदार जाधव यांचे मुखपृष्ठ देखणे. गुरूवर्य वासुदेव मुलाटे सरांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना ही एक ठळक नोंद आहे.

आदित्य प्रकाशनाची अप्रतिम बांधणी मनोवेधक.

डॉ. प्रभाकर शेळके
जालना

# मोदी सरकारमुळे गोरगरिबांच्या सहभागातून विकसित भारताकडे वाटचाल : आ. प्रवीण दरेकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी गोरगरिब, वंचितांचा विकास करून विकसित भारत संकल्प प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने निर्धारपूर्वक वाटचाल केली आहे. सरकारी योजनांच्या निधी वाटपातील भ्रष्टाचार थांबवून गोरगरिब, गरजू वर्गांपर्यंत योजनांचे लाभ 100 टक्के पोहचविल्याने सुमारे 25 कोटी भारतीय दारिद्र्यरेषेच्या वर आले आहेत, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेतील गटनेते आ.प्रवीण दरेकर यांनी बुधवारी केले. मुंबई भाजपा कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. दरेकर बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. गरजेनुसार आर्थिक धोरणात केलेले बदल आणि राबवलेल्या आर्थिक सुधारणांमुळे आज देशाची अर्थव्यवस्था ही जगात पाचव्या क्रमांकाची बनली आहे असेही त्यांनी सांगितले. दरेकर यांनी मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी, देशाच्या अर्थव्यवस्थेचे 2014 पर्यंतचे चित्र आणि गेल्या 10 वर्षांत अर्थव्यवस्थेची झालेली घोडदौड, पायाभूत सुविधांचा 2014 पासून झालेला विकास याचा लेखाजोखा आकडेवारीसह सादर केला. ते म्हणाले की, 4 कोटी गरजूंना पक्की घरे, 80 कोटी जनतेला मोफत अन्न धान्य, 14 कोटी कुटुंबांच्या घरात नळाद्वारे पिण्याचे पाणी, 10 कोटी गॅस कनेक्शन, 12 कोटी स्वच्छतागृहांची बांधणी, सौभाग्य योजनेमुळे ग्रामीण भागात 100 टक्के विद्युतीकरण, कोरोना संकटातून बाहेर पडण्यासाठी 78 लाख फेरीवाल्यांना 10 हजार कोटींचे कर्ज,



सरकारी निधीच्या वाटपात होणारी गळती थांबवून लाभार्थ्यांपर्यंत 100 टक्के पोचवणे ही मोदी सरकारच्या 10 वर्षांतील कामगिरीची ठळक वैशिष्ट्ये आहेत. 51 कोटी पेक्षा अधिक नागरिकांची जनधन बँक खाती सुरु केल्याने एका पैशाचीही गळती न होता सरकारी योजनांचे अनुदान, अर्थसाह्य थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. गेल्या 10 वर्षांत 34 लाख कोटी रु. लाभार्थ्यांच्या बँक खात्यांत जमा झाले आहेत. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन दिल्यामुळे 2016 पासून गेल्या 8 वर्षांत 26 हजार 500 कोटी एवढ्या रकमेचे व्यवहार युपीआय द्वारे झाले आहेत. यूपीए सरकारच्या कारभाराची तुलना भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारशी करत आज देशात घडलेले परिवर्तन दर्शवणारी आकडेवारीही आ.दरेकर यांनी यावेळी सादर केली. आ. दरेकर यांनी सांगितले की, 2014 साली एलपीजी गॅस सिलेंडर्स वर सरकारकडून मिळणारी सबसिडी डीबीटी म्हणजे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजने अंतर्गत थेट बँक खात्यात जमा करणे बंद केले होते. मोदी सरकारच्या काळात 2022 पर्यंत गरीब कुटुंबांची 73,000 कोटींची बचत डीबीटी मुळे झाली. 2014 साली प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत केवळ 55 टक्के गावे रस्त्यांनी जोडली गेली होती. 2023 पर्यंत 99 टक्के गावे ही रस्त्यांनी जोडली गेली. 2014 साली माफक दरात औषधे पुरवणारी केवळ 80 जन औषधी केंद्रे देशात होती. तीच आजमितीला 10 हजार केंद्रे आहेत. 2014 साली ग्रामीण भागात सरासरी 12.30 तास वीज पुरवठा होत असे, आज तोच साडे बावीस तास होत आहे. प्रत्येक घटकापर्यंत सरकारी योजनांचे लाभ पोहोचावेत याला प्राधान्य देत त्या दिशेने प्रयत्न करण्यात आल्याचे आ.दरेकर म्हणाले. देश विकास हेच मोदी सरकारच्या सत्तेचे ध्येय असल्याने त्याच दिशेने विकास कार्ये झाली. त्यामुळेच देशाचा विकसीत, आत्मनिर्भर भारताच्या दिशेने प्रवास गतीने सुरु आहे. आगामी पाच वर्षांमध्ये सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहीलेल्यांपर्यंत लाभ पोहोचवण्याचा संकल्प मोदी सरकारचा आहे, असेही ते म्हणाले.

# विनापंप वर्षभर वाहणाऱ्या आर्टीझन विहिरीचे रहस्य उलगडले

## गणपूर सभोवती आढळले विशाल भूपट्टीय विवर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा हा भौगोलिक दृष्ट्या एक चमत्कार असून ह्यात अनेक रहस्य दडलेले आहे आणि अजून अनेक रहस्यांचा उलगडा व्हायचा आहे. जिल्ह्यातील गोंडपिंपरी तालुक्यात कान्हाळगाव जवळ एकमेव विना मोटरने सतत वाहणाऱ्या आर्टीझन विहिरी आढळल्या होत्या, परंतु त्या कश्यामुळे निर्माण झाल्या त्याचे गूढ आतापर्यंत उलगडले नव्हते. येथील पर्यावरण आणि भूशास्त्र अभ्यासक प्रा सुरेश चोपणे ह्यांनी तेथे भेटी देवून, उपग्रह सर्व्हेच्या माध्यमातून लंबवर्तुळाकार मोठे टेक्टोनिक बेसिनचा शोध धेतला असून त्यात पाण्याचे साठे असल्याचे म्हटले आहे. गोंडपिंपरी भूभाग गोदावरी प्राणहिता बेसिन चा भाग असून गोदावरी रिफ्ट व्हेली मध्ये समावेश होतो म्हणूनच गोंडपिंपरी, पोभुर्णा आणि मुल तालुका क्षेत्र हे फाल्ट झोन, भूकंपीय क्षेत्र ३ प्रकारात आहे. येथील गणपूर-कान्हाळगाव भुपट्टीय विवर हे आतून ९ बाय ४ किमी तर बाह्य विवर १२ बाय २० किमी आकाराचे आहेत. हे विवर २००-१६० कोटी वर्षाच्या मेसो-प्रोटेरोझोईक काळातील पाखल ग्रुप मध्ये बनले असून भूपट्टीच्या टकरीमुळे गोल झालेले आहे .ह्या गणपूर- कान्हाळगाव विवरात



मधल्या भागात वाळू आणि शेल असून हा भूभाग १९-२३ कोटी वर्षाच्या गोंडवाना सुपरग्रुपच्या (जुरासिक-पर्मियन) कामठी फोर्मेशन खडकांनी बनला आहे. ह्याच थरात पाण्याचे मोठे साठे आहेत. गणपूर हे गाव खोल भागात असून कान्हाळगाव आणि पोम्भूर्ना गाव हे वरच्या भागात आहे.विवराच्या मध्य भागात.गणपूर जवळ उंची १८९ मीटर तर सभोवताली असलेल्या भागाची परिसरातील उंची २२० ते २५० मीटर आहे. म्हनजेच हे विवर मध्ये ६२ मीटर खोल आहे. सभोवताली असलेल्या टेकड्यांचा भाग हा विवराचा बाह्यभाग असून तो भूपट्टीय टकरीमुळे उंच आणि गोलाकार झाला आहे. ह्या भागाला भूशास्त्रीय भाषेत ( TECTONIC BASIN, STRUCTURAL BASIN, ALTITUDE OF JOINTS, ALTITUDE OF BENDING ,TILTED AND FOLDED ROCKS) अनेक व्याख्या आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात कान्हाळगाव येथे आणि अलीकडे मानोरा येथे आर्टीझन वेल (विना मोटारने सतत वर्षभर वाहणारी कुपनलिका) आढळल्या आहेत. ह्या अश्या प्रकारच्या बशीच्या आकाराच्या भूशास्त्रीय रचना भुपटीय हालचालीमुळे तयार होतात हे सर्वश्रुत आहे,परंतु ही रचना जमिनीवरून ओळखता किंवा पाहता येत नाही.अतिशय बारकाईने उपग्रहाच्या माध्यमातून दिसू शकतात. प्रा सुरेश चोपणे ह्यांनी ही रचना तिथे जावून शोधण्याचा अनेकदा प्रयत्न केला परंतु ते शक्य झाले नाही ,परंतु जेव्हा दूर अंतरावर मानोरा येथे अशीच कुपनलिका आढळली तेव्हा साटेलाईट च्या माध्यमाने आणि भूशास्त्रीय अभ्यासाच्या आधारे शोध घेतला तेव्हा कळले की तिथे एक विवर उत्तर -दक्षिण कान्हाळगाव ते पोभुर्णा, पूर्व-पाश्चिम कोठारी ते आक्सापूर इथपर्यंत व्यापले आहे आतील भाग ९ X ४ किमी आकाराचा तर बाहय भाग १२ बाय २० किमी आकाराचे भूपटीय विवर आहे . भूखंडाच्या प्रचंड दाबाने इथे सभोवताली उंच-सखल आणि टेकड्या निर्माण झालेल्या आहेत. ह्या विवराच्या सभोवताली भूगर्भात उत्तर-दक्षिण दिशेला बशीच्या आकारात मुबलक पाण्याचे साठे आहेत. हे साठे एखाद्या मध्यम आकाराच्या धरणा इतका असावा .त्यामुळे ह्या क्षेत्रातील परिघात कुपनलिका खोदल्यास आर्टीझन विहीर लागते.

**गणपूर विवरात मध्ये पाण्याचे मोठे साठे आढळले**
कान्हाळगाव ते पोम्भूर्णा हा भूभाग प्राणहिता–गोदावरी बेसिन चा भाग असून गोंडवाना स्तरित खडकाचा भाग आहे .त्यामुळे ह्या भागांत आणि विशेषता गणपूर विवराच्या सभोवताली मोठे पाण्याचे साठे आहेत .विशेष म्हणजे हे साठे ५० ते १५० मीटर इतक्या खोल अंतरात आहे .लाखो वर्षापूर्वी साठविल्या गेलेले हे पाणी ३ बोअरवेल च्या माध्यमातून सतत बाहेर येत असते .हे जलसाठे एखाद्या मध्यम आकाराच्या धारणा इतका साठा त्यात आहे . भूशास्त्र आणि भूजल विभागाच्या सहाय्याने ह्या साठ्यांचा सुरक्षित वापर केल्यास दुष्काळ स्थितीत ह्या भागांत पिण्याच्या पान्यासाठी, शेतकऱ्यांसाठी आंनी वण्यजीवासाठी हा साठा वरदान ठरू शकतो .

**गोन्दिपपरी ते मुल हे भूकंपीय क्षेत्र** : कान्हाळगाव ते मुल आणि चंद्रपूर पर्यंत हे भूकंप प्रवण क्षेत्र असून झोन ३ मध्ये येते . भूशास्त्रीय दृष्ट्या ह्या क्षेत्राचे गोदावरी रिफ्ट व्हेली मध्ये समावेश होतो म्हणूनच गोंडपिंपरी, पोभुर्णा आणि मुल तालुका क्षेत्र हे फाल्ट झोन आहे . ह्या क्षेत्रात सब टेक्टोनिक प्लेट्सच्या विविध हालचालीमुळेच येथे बेसिन, बेन्डीग आणि फाल्ट निर्माण झाले आहेत आणि ह्यापूर्वी इथे भूकंप झाले आहेत .
**प्रा .सुरेश चोपणे,**
**पर्यावरण आणि भूशास्त्र अभ्यासक,**
**चंद्रपूर**

# वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या शिलेदारांचा भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**
**जळगाव जा :** १६ व १७ मार्च रोजी वरवट बकाल येथे यशस्वीपणे पार पडलेल्या तीसऱ्या वैदर्भीय आंबेडकरी साहित्य सम्मेलनाचे मुख्य आयोजक भाऊ भोजणे आणि अभयसिंग मारोडे यांचा व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष गुलाबराव इंगळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून जळगाव जामोद येथील व्हाईस ऑफ मीडियाच्या कार्यालयात भव्य सत्कार करण्यात आला.

जळगाव जामोद, संग्रामपूर तालुक्यात साहित्यांची चळवळ असून नसल्यागत आहे.हे दोन्ही तालुके सातपुडा डोंगराच्या पायथ्याशी असून शेती हाच इथल्या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे या भागातील लोकांमध्ये साहित्य संमेलनाबाबात पाहिजे तेवढी आस्था दिसून येत नाही, असे असतांना वरवट बकाल येथील एक भणंग अवलिया पायाला भिंगरी बांधून साहित्य सम्मेलनाच्या तयारी साठी कंबर कसतो . ते सुध्दा ह्या परिसरात धडा चा एकही साहित्यीक नसतांना ही मशाल धगधगती ठेवतो.एकटा फिरतो. ह्याच्या त्याच्या तोंडाशी जातो. मदतीची अपेक्षा बाळगतो अन् त्यांच्या भणंग पणा च्या कौतुका पायी निधी देतात काही देऊ करतात, पण हा जो दे उसका भी भला जो ना दे उसका भी भला म्हणून आपलं कार्य तेवढयाच उत्साहाने करतो. जवान माणसाले त्यांचा हेवा वाटावा. सतत कार्यमग्न.बरं हा अवलिया थकला अस कधिच दिसला नाही.त्याची धडपडच निराळी.



हा अवलीया म्हणजे,ज्यांनी आपली उभी हयात संघर्षाच्या वणव्यात वादळ वाऱ्याची पर्वा न करता गोरगरीब, कष्टकरी, शेतमजूर,महिला, आदिवासी बांधवांच्या न्याय हक्कासाठी घालवली.ज्यांना सर्व लोक आदराने भाऊ म्हणतात.भाऊचा दराराच निराळा. मोठी दाडी-मिशी,उंचपुरा दनकट बांध्याचा पाहताक्षणीच पायाखालची जमीन सरकावी. पण हा माणूस अतीशय हळव्या मनाचा. तितकाच प्रेयळ स्वभावाचा.भाऊच्या सोबतीला खांद्याला खांदा लावून साहित्य सम्मेलनाची जबाबदारी लिलया पेलणारा, भगतसिंग, डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज , महात्मा फुले या महापुरुषांची विचारधारा ताकदीने जनमानसात रूजवणारा.तरूण, तडफदार आणि तेवढाच विचाराने प्रगल्भ असलेले झाशी पळशीचे अभयसिंग मारोडे.

ही दोघेही कवि, साहित्यिक, विचारवंत आणि तेवढ्याच ताकदीचे वक्ते आहेत.त्यांनी वरवट बकाल येथे १६व १७ मार्च रोजी तीसरे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन साहित्य संमेलन विदर्भवीर भाई के.आर.पाटील साहित्य परिसरात भिकमजी उर्फ लालासेट चांडक विचार मंच,सहकार विद्या मंदिर वरवट बकाल तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा येथे घेण्याचे ठरवले. सम्मेलनाची जोरदार तयारी केली. स्टेज, साऊंड, जेवण आलेल्या सर्व साहित्यीकांची दोन दीवस राहण्याची व जेवणाची व्यवस्था केला.सम्मेलणाचे स्वागताध्यक्ष प्रसेनजीत पाटील,सम्मेलनाध्यक्ष प्रा.माधव सरकुडे तर उद्घाटक म्हणून प्रा. गंगाधर अहिरे होते. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद, एकपात्री नाट्यप्रयोग (शिल्पकार), कथाकथन, परिचर्चा एक, एकपात्री नाट्यप्रयोग (आयुष्य नांगरतांना), परिचर्चा दोन, समारोप आणि शेवटी समारोपीय कविसंमेलन अशा नियोजनबद्ध आणि शांततेत अगदी थाटामाटात हे सम्मेलन पार पडले.विशेष म्हणजे महामंडळाच्या अध्यक्षा सिमाताई मेश्राम यांच्या भाषणाने उपस्थीतांची मने जिंकली. तर साहित्य संमेलनासाठी खास नागपूर वरून आलेले जेष्ठ कवी, साहित्यिक लोकनाथ यशवंत, किशोर बळी, गंगाधर अहिरे,माधव सरकुंडे, रमेश जीवने, विलास थोरात, गजानन बनसोड, नरेंद्र इंगळे, विठ्ठल कुलट, भिमराव गोपनारायन, भिमराव परघरमोर, नारायण जाधव,माया दामोधर, डॉ.प्रकाश राठोड, विजयालक्ष्मी वानखेडे अशा तोलामोलाच्या दमदार साहित्यीकांमुळे साहित्य संमेलनाने फार मोठी उंची गाठली आणि रसिकांनाही वैचारिक मेजवानी मिळाली. विशेष म्हणजे दोन दिवस हे साहित्य संमेलनाचे लॉर्ड बुद्धा टीव्हीवर लाईव्ह दाखवण्यात आले. एकदरीतच सोळा राज्यांमध्ये या सम्मेलनाचे थेट लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. साहित्य संमेलन मुख्य संयोजक भाऊ भोजणे, अभयसिंग मारोडे आणि त्यांचे सहकारी विठ्ठल निंबोळकर,नारायण सावतकर, काशीनाथ मानकर, गुलाबराव इंगळे या सर्वांच्या सहकार्याने वरवट बकाल येथील तीसरे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पडले, अशा या साहित्य संमेलनाच्या शिलेदाराचा यथोचित सन्मान व्हाईस ऑफ मीडियाच्या जळगाव जामोद टीम कडून जळगाव जामोद येथे करण्यात आला.

# अनिल परब यांच्या साई रिसॉर्टवर अखेर हातोडा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उबाठा गटाचे नेते आणि माजी मंत्री अनिल परब यांचे निकटवर्तीय मानले जाणारे सदानंद कदम यांच्या मालकीच्या खेट येथील साई रिसॉर्टचे बांधकाम पाडण्याचे काम सुरू झाले आहे. भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी याबद्दलचा व्हिडिओ एक्स वर टाकला आहे. रिसॉर्टचे पाडकाम करत असतानाच अनिल परब आणि सदानंद कदम यांच्यावर फौजदारी कारवाईदेखील होणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले. दोन दिवसांपूर्वीच किरीट सोमय्या यांनी एक्स वर पोस्ट टाकून दोन दिवसात रिसॉर्ट पाडण्याचे काम सुरू होणार असल्याचे म्हटले होते. त्यानंतर रिसॉर्टचे पाडकाम सुरू झाले आहे. साई रिसॉर्टचे बांधकाम सीआरझेडच्या नियमाचे उल्लंघन करून बांधण्यात आले आहे. याबद्दल परब यांच्यावर गुन्हा दाखल असून ते जामिनावर बाहेर आहेत, असेही किरीट सोमय्या यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले. काही दिवसांपूर्वीच उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली असताना अनधिकृत आणि अतिरिक्त बांधकाम स्वखर्चाने पाडू, असे प्रतिज्ञापत्र सदानंद कदम यांनी दिले होते. द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीनुसार रिसॉर्टच्या तिसऱ्या मजल्यावरचे बांधकाम पाडण्याचे काम सुरु झाले असून पुढचे दोन-तीन दिवस हे काम चालणार आहे. जानेवारी महिन्यात ईडीने साई रिसॉर्टची १० कोटींची मालमत्ता जप्त केली होती. याप्रकरणी सदानंद कदम आणि अनिल परब यांच्याविरोधात मनी लॉंडरिंगचाही गुन्हा ईडीने दाखल केला होता. केंद्रीय पर्यावरण आणि वन खात्याने दाखल केलेल्या तक्रारीनंतर ईडीने या प्रकरणात हस्तक्षेप केला. या

# बच्चू कडूंचा भाजपला जाहीर सभेत इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आम्हाला धमक्या मिळताहेत की जास्त बोलाल, तर तुरुंगात पाठवू, उखडून फेकून देऊ, मी त्यांना म्हणतो, जा तुमच्या बापाला पाठवा, आजोबा कुणी असतील, तर त्यांना पाठवा. बच्चू कडूंवर शेतकरी, दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी साडेतीनशे गुन्हे दाखल आहेत. बच्चू कडूंनी चार महिने तुरुंगात दिवस काढले आहेत. आला दुपट्टा घातला आणि नेता झाला, असा बच्चू कडू नाही. अजूनही तुरुंगात टाकले, तरी बेहत्तर, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आम्ही आवाज उठवत राहणार, असा इशारा आमदार बच्चू कडू यांनी बुधवारी येथे एका जाहीर सभेत दिला.
प्रहार जनशक्ती पक्षाचे दिनेश बुब यांनी बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी प्रहारने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. नेहरू मैदानावर आयोजित जाहीर सभेत बोलताना बच्चू कडू यांनी भाजपवर टीका केली. ते म्हणाले, उद्याचा दिवस कसा आहे, हे आपल्याला ठाऊक नाही. कदाचित तुरुंगाची पायरीदेखील चढावी लागेल. पण, आपण शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांचे प्रश्न मांडत राहणार.



# साहेब... आमचं कधी भलं होईल.. ?

## भोकरमधील मतदारांचा सवाल; पुढाऱ्यांचा खुर्चीसाठी खटाटोप

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** इलेक्शन हंगाम तोंडाशी आला की नेते मंडळीची चुळबुळ सुरु होते.. आमुक करू तमूक करु म्हणत कुरवाळतात.. ऐरवी कुणीबी पाच वरीस ईचारत नाही.. गरीब बिचारा मतदार अठरा विश्व दारीद्रात खीतपत पडला आहे.. नेतेमंडळी गोड आश्वासन देऊन पसार होतात.. एकदाची खुरची मिळाली की ईसरून जातात..ना शेतीबाडीची पर्वा ना ईकासाचा पत्ता..आमच्या ऊतरंडीत सदा खडखडाटच.. आम्ही नेहमीच मतदान देवुन ईमान राखतो पण.. तरी तुम्हाला आमची किव येत नाही..साहेब.. आमचं नशीब कधी ऊजळल.. असा संतप्त सवाल मतदार करून थकला तरी कायबी पदरात पडत नाही.

पूर्वी खेडोपाडी मान, मर्तबा, ईज्जत, माणूसकीचा ओलावा असायचा. गावातील पारावर बैठक घेऊन मुख्य नायक जो निर्णय देईल त्यावर ग्रामस्थ ठाम असायचे. आता सार रूपच पालटून गेलं आहे. दगडाखाली नेते, पुढारी झालेत. कूणीकूणाच ऐकून घेत नाही. गावागावात गटतटाची कीड लागली आहे. लोखाभिमुख विकास होताना दिसत नाही. निवडणूकीचा हंगाम आला की राजकीय मंडळीची चुळबुळ सुरु होते. एरवी कुणी ईकडे फिरकत नाही. तळागाळातील सर्व सामान्य माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. प्रामुख्याने शेती, शिक्षण, आरोग्य, पाणी टंचाई अशा अत्यावश्यक सुवीधाकडे राजकीय मंडळी लक्ष देत नाहीत. निवडणूक दरम्यान जाहीर नाम्यात नमूद केलेली कामे किती प्रमाणात मार्गी लागली याचा थांगपत्ता लागत नाही. तालुक्यात सध्या लोकसभा निवडणुकीने विविध राजकीय पक्षाचे नेते, पुढारी, पदाधिकारी, कार्यकर्ते मतदाराना गोंजारत असल्याचे दिसून येत आहे. मागील पाच वर्षात त्यांना कधीच मतदाराची आठवण आली नाही. तेच मंडळी स्वताची खुर्ची टिकवण्यासाठी जीवाच रान करीत आहेत.हेच परिश्रम अगोदर पासून घेतले असते तर दारोमदार फिरण्याची वेळ आली नसती अशी राजकीय जाणकार मंडळीत चर्चा सुरू आहे. तुम्ही तुमची सत्ता काबीज करा पण मतदारांच्या मुलभूत गरजांकडे तितक्याच तन्मयतेने पाहण गरजेचे आहे, असे मत सुजाण मतदारांकडून चर्चीला जात आहे.



## रिपब्लिकन पक्षात पदाधिकाऱ्यांच्या निवडी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या आदेशानुसार व सातारा जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कोरेगाव तालुका व खंडाळा मध्ये काही नवीन पदे निवडी करण्यात आली.सातारा जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांनी पदनियुक्त पत्र देऊन पुढील वाटचाली शुभेच्छा दिल्या. कोरेगाव तालुका अध्यक्ष नितीन बोतालजी व खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे यांच्या उपस्थितीत या निवडी करण्यात आल्या. नूतन निवडी जाहीर केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे. कोरेगाव तालुका अध्यक्ष नितीन बोतालजी यांनी कार्यक्रमात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त १४ एप्रिलला कशा पध्दतीचे नियोजन आहे. यावर चर्चा केली. नवीन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कोरेगाव, कराड, खंडाळा, वाई, खटाव मधील प्रत्येक तालुका पदाधिकाऱ्यांनी नवीन पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना पक्ष कशा पद्धतीने चालवायचा व वाढेल याबद्दल मार्गदर्शन केले.गणेश शंकर वायदंडे (कोरेगांव तालुका युवक उपाध्यक्ष), दीपक हणमंत खरात (कोरेगांव तालुका युवक कार्याध्यक्ष), सुहास कांबळे (खंडाळा तालुका उपाध्यक्ष), अनिल केदारी (खंडाळा तालुका सल्लागार) ह्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.यावेळी सातारा जिल्हा अध्यक्ष तथा महाराष्ट्र उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ, सातारा जिल्हा युवक अध्यक्ष सोमनाथ धोत्रे, कोरेगाव तालुका अध्यक्ष नितीन बोतालजी,सातारा जिल्हा सरचिटणीस संतोष भाऊ जाधव, सातारा जिल्हा सचिव किरण बगाडे,जिल्हा युवक अध्यक्ष प्रशांत शिवशरण, आय टी सेल जिल्हा अध्यक्ष विशाल भोसले,खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे, कोरेगाव शहराध्यक्ष शिरी आवळे,सातारा जिल्हा युवक सचिव अनिल उमापे, महाबळेश्वर तालुका अध्यक्ष अमित मोरे,सातारा तालुका अध्यक्ष राम मदाळे, सातारा युवक जिल्हा उपाध्यक्ष सुनील ओव्हाळ, वाहतूक आघाडी जिल्हा अध्यक्ष नानासाहेब ओव्हाळ, कराड तालुका अध्यक्ष मुकुंद माने, तसेच महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्ष स्मिता जगताप, कोरेगाव तालुका महिला आघाडी मनीषा सोनवणे, कोरेगाव कार्याध्यक्ष सुप्रिया येवले, जिल्हा सचिव वनिता खवळे, खंडाळा तालुका अध्यक्ष सविता सपकाळ, कोरेगाव तालुका उपाध्यक्ष सगरे मॅडम, कोरेगाव सरचिटणीस संजना पोतदार इत्यादी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बल्लारपुरातून तेलंगणाला जाणारा दारूसाठा जप्त : आरोपी ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** आगामी लोकसभा निवडणुकीचा पार्श्वभूमीवर आदर्श आचार संहिता सुरु असतांना अवैधरीत्या दारुचा साठा बल्लारपुर येथून तेलंगाणा येथे रेल्वेनी घेऊन जाणाऱ्या दोन आरोपींना बल्लारपूर पोलिसांनी अटक केले.

गुप्त बातमीदाराकडुन बल्लारपुर पोलीसांना माहिती मिळाली की २ एप्रिल रोजी रात्री रेल्वे ने दारू घेउन जाणार आहेत. रात्री २ वाजता ते २.४५ वाजता चे सुमारास रेल्वे चौक, चल्लारपुर येथे कारवाई करत पवन लालु घुगलोत (२२), धंदा-मजुरी,लालु पंतलु घुगलोत (५२) वर्षे दोन्ही रा. शिवनगर वार्ड बल्लारपुर जि. चंद्रपुर यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणे बल्लारपुर येथे गुन्हा रजि.क्रं.३२५/२०२४ कलम ६५ (अ), ८३ महा.दा. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यांच्याकडून लाल रंगाच्या बॅगमध्ये एकुण-१४ नग रॉयल स्ट्रॅग डिलक्स व्हिस्की प्लॉस्टीक बॉटल, प्रत्येकी २ लिटर प्रमाणे विदेशी दारु त्यांचे बेंच क्रं. ३६१५ ११ फेब्रुवारी २०२४ असे लेबल लागलेली प्रत्येकी कि. १ हजार ८५० रु. प्रमाणे कि.अं. २५ हजार ९०० रु., निळ्या रंगाच्या बॅग मध्ये एकुण-२०० नग देशी दारु रॉकेट संजा प्रत्येकी १० एम.एल. भरलेल्या महाराष्ट्र निर्मीत प्लॉस्टीक शिशा प्रत्येकी कि.अं.३५/-रु. कि.अं. ५ हजार रु. तसेच वाहतुकीसाठी वापरलेली जुनी वापरती काळ्या रंगाची हिरो मायस्ट्रो मोपेड के. MH३४ ८१ 3591 कि.अं. ३५ हजार रु. असा एकुण- ६७ हजार ९०० रुपयाचा मुद्देमाल मिळुन



आला असून ते जप्त करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु, दिपक साखरे उपविभागीय पोलीस अधिकारी, राजुरा यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक आसिफराजा बी. शेख, स.पो.नि. दिपक कांक्रेडवार, पोहवा संतोष दंडेवार, पो.अं. गणेश पुरडकर यांनी केले.

## लोखंडेंचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुख्यमंत्री उपस्थित राहणार : चौधरी

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** लोकसभा मतदार संघाची महायुतीची उमेदावारी



खासदार सदाशिव लोखंडे यांना जाहीर झाली आहे. खासदार सदाशिव लोखंडे यांच्यावर मुख्यमंत्र्याचे विशेष प्रेम असल्याने त्यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार असल्याची माहिती संपर्क नेते व शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी दिली. शिर्डी येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीच्या निमित्ताने चौधरी उपस्थित होते. बैठकिला संबोधित करताना चौधरी यांनी सांगितले की, महायुतीने ४५ जागा जिंकून आणण्याचा नारा दिला आहे. त्या अनुषंगाने खासदार लोखंडे यांना निवडून आणण्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न करायचे असून प्रचारात कोणत्याही प्रकारती कसर राहणार नाही याची काळजी घेण्याच्या सुचना चौधरी यांनी केल्या. कोविडच्या काळामध्ये खासदार निधीच दिला जात नव्हता, त्यामुळे अनेक कामे रखडली होती. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे झाल्यानंतर त्याची भर काढून देण्यात आली. मोठ्या प्रमाणात मतदार संघात निधी दिला गेला. निळवंडेसारखे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. नामदार राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणुक लढवली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. आमदार आशुतोष काळे, किरण लहामटे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, वैभव पिचड, भाऊसाहेब कांबळे, बाळासाहेब मुरकुटे, चंद्रशेखर कदम, आण्णासाहेब म्हसके, सिताराम गायकर हे सर्व मनापून सोबत असल्याने दोन लाखांच्या मताधिक्याने विजय निश्चित आहे. भाजप, राष्ट्रवादीचे, आर पी आय महायुतीचे कार्यकर्तेही अर्ज दाखल करण्याच्या दिवशी उपस्थित राहणार असल्याचेही चौधरी यांनी सांगितले. विरोधकांनी कोणत्याही खालच्या थराला जावून जरी प्रचार केला तरी, शिर्डी मतदार संघातील जनता सुज्ञ आहे, ती भुलथापांना बळी पडणार नाही. येथे पुन्हा शिवसेनेचाच भगवा पडकणार असल्याचा विश्वास चौधरी यांनी व्यक्त केला. या बैठकीच्या निमित्ताने प्रचार यंत्रणेचा आढावा घेण्यात आला.

## बाजार सावंगी सर्कलमध्ये ठिकठिकाणी लोंबकळत आहेत धोकादायक विद्युत तारा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसुल मंडळ सर्कलमध्ये परिसरात ठिकठिकाणी विद्युत तारी एकदम खाली म्हणजे चारपाच फुटांवर असल्याने व नागरिक व गुरांचा वापर असल्याने धोकादायक बनले असल्याचे चित्र आहे. महसूल मंडळ सर्कलमध्ये परिसरात बाजार सावंगी सह कनकशीळ, रेल, इंदापूर, बोडखा, लोणी, झरी, शेखपूर, धामणी, गंधेश्वर, दरेगाव, पाडळी, सोबलगाव हनुमान वाडी, ताजनापूर, ममुराबाद, वडोद, कानडगाव, विरमगाव, टाकळी ठिकठिकाणी शेतालगत विद्युत तारी एकदम खाली असून खांब वाकलेले स्थितीत दिसून येत आहे.तर कनकशीळ व बोडखा या गावात ठिकठिकाणी शेतलगत वापराच्या ठिकाणी विद्युत चारपाच फुटावर खाली येवून धोकेदायक बनली आहे.यापुर्वी बोडखा रस्ता लगत दरम्यान तारी खाली आल्याची दैनिकाने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर विजमहावितरण कंपनी ने खांब उभारुन तारी वाढुन टाईट केले होते. सद्या महसूल मंडळ सर्कल मधे परिसरात ठिकठिकाणी विज महा वितरण कंपनी ची तारी खाली आली असून ती धोकेदायक बनली आहे. विभागाने याची परिसरात पाहणी करून व खांब व तारी सरळ करुन ग्रामस्थांच्या तथा शेतकरी व गुरांचा धोका टाळावा, अशी मागणी ग्रामीण ग्रामस्थांनी केली आहे.

## सेवानिवृत्त जवानाचा लोहा ठाण्यात सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** भारतीय सैन्य दलातील जवानाने मायभूमीच्या रक्षणासाठी तब्बल सतरा वर्ष प्रदीर्घ सेवा बजावून मार्च अखेर रामराव राठोड सेवानिवृत्त झाले. लोहा तालुक्याचे भूमिपुत्र देश सेवेवरून परत आल्यानंतर सेवापूर्ती निमित्त लोहा पोलिस ठाण्याच्या वतीने राठोड यांचा पोलिस ठाणे प्रांगणात सन्मान केला. लोहा तालुक्यातील माळाकोळी ग्रामपंचायत अंतर्गत रुपला तांडा येथील सामान्य गोरगरीब कुटुंबातून आसलेल्या रामराव वामन राठोड यांना प्रारंभीपासूनच देशसेवा करण्याची प्रबळ इच्छा होती. भारतीय सैन्य दलात भरती झाल्यानंतर त्यांनी तब्बल १७ वर्ष निष्ठेने आणि प्रामाणिकपणे देशसेवा केली. त्यादरम्यान त्यांनी, जम्मू काश्मीर, राजस्थान, हरियाणा, कर्नाटक, सिक्कीम, एनएसजी कमांडो आदी ठिकाणी यशस्वी सेवा बजावून बंगळूर येथून सेवानिवृत्त झाले. राठोड लोहा येथे येताच त्यांचा लोहा पोलिस ठाण्याच्या वतीने पुष्पहार घालून त्यांचा सन्मान केला. यावेळी पोलिस उपनिरीक्षक मंगेश नाईक, जि. प. बांधकाम विभागाचे प्रमुख शिवाजी राठोड, बाजार समितीचे माजी संचालक विजय राठोड, पोलिस ठाण्याचे सदाशिव जामकर, अशोक केंद्रे, तिडके, मठपती, नारायण कदम, दिनेश राठोड, पत्रकार प्रदीप कांबळे आदींसह बहुसंख्येने उपस्थिती होती.



# देवतळे, पाऊनकरांच्या प्रवेशाने भाजपला काय साध्य होणार ?

आधुनिक केसरी



शाम हेडाऊ

चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निवडणूक 2024 आता चांगलीच रंगात यायला लागलेली आहे. आणि निवडणुकीच्या तोंडावर अनेक मातब्बर नेते आणि काही पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते सुद्धा कोलांटउड्या मारत आहेत. भाजपने आपल्या पक्षाची द्वारे सताड उघडी ठेवली असून या प्रवेशद्वारातून भाजपने अनेकांचे स्वागत करणे सुरू केले आहे. अशाच स्वागत समारंभात चंद्रपूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रकाश देवतळे आणि चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष मनोहर पाउणकर या दोघांनीही एका मागे एक भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करत आपल्या गळ्यात कमळाचा दुपट्टा टाकून घेतलेला आहे. निवडणुकीच्या तोंडावर होत असलेले हे सगळे पक्ष प्रवेश खरोखरच भाजपाला मदत करणारे ठरणार आहे का ? असा प्रश्न आता सामान्य कार्यकर्त्यांना पडायला लागला आहे . ज्यांनी सतत भाजपवर टीकाच केली असे लोक ऐन निवडणुकीच्या तोंडावर काहीतरी प्रलोभन डोळ्यासमोर ठेवत भाजपामध्ये प्रवेश करू लागले आहेत. प्रकाश देवतळे हे वडेट्टीवारांचे अगदी खास म्हणून ओळखले जातात. देवतळे यांचा भाजपा प्रवेश म्हणजे मुनगंटीवार वडेट्टीवार मैत्रीचा महत्त्वाचा दुवा असा पाहायला मिळतोय. वडेट्टीवार यांनी देवतळे यांच्या माध्यमातून आपली ताकद मुनगंटीवार यांच्या पाठीमागे उभी केली आहे असच चित्र यातून स्पष्टपणे दिसत आहे. परंतु , प्रकाश देवतळे यांचं काँग्रेस पक्षातलं नेमकं स्थान काय ? कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याबद्दल किती आदर होता- ? किंवा ते ज्या तेली समाजाचे नेतृत्व करतात त्या तेली समाजामध्ये त्यांचं नेमकं स्थान नेमकं काय ? काँग्रेसची उमेदवारी घोषित होण्याआधी देवतळे यांनी विनायक बांगडे यांना सोबत घेत तेली समाजाची बैठक घेतली होती. त्यात त्यांनी दोन दिवसात काँग्रेसने आपली उमेदवारी जाहीर करावी अन्यथा वेगळी भूमिका घेण्यात येईल असे स्पष्ट सांगितले होते.

ही वेगळी भूमिका म्हणजे माझा भाजप प्रवेश असा इशारा तर नव्हता ना ? हा एक प्रश्न . तर , त्याच सभेमध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जे तेली समाजातूनच येतात विनायक बांगडे हे सुद्धा आता देवतळेंच्या पाठोपाठ भाजपमध्ये प्रवेश तर करणार नाहीत ना ? अशी चर्चा आता चांगलीच रंगायला लागलेली आहे . आणि या सर्व पार्श्वभूमीवर देवतळे यांचा भाजपला नेमका किती आणि कसा फायदा होणार ? हा प्रश्न खूपच चर्चिला जात आहे.

देवतळे यांच्या पाठोपाठ चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष मनोहर पाऊनकर यांनी सुद्धा भाजपमध्ये प्रवेश केला . परंतु मनोहर






पाऊणकर हे ज्या कुणबी समाजातून येतात त्या कुणबी समाजात मनोहर पाऊनकर यांचे स्थान नेमके काय ? दुसरा प्रश्न असा की , मनोहर पाऊकर यांच्यावर चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अनुकंपा तत्त्वावरील नौकर भरतीच्या संदर्भात आरोप होऊन त्यांनी तीन महिन्याचा कारावास सुद्धा भोगलेला आहे . अशा भ्रष्ट व्यक्तीला पक्षात घेऊन भाजपने नेमके काय साध्य केले आहे ? अनुकंपा तत्वावरील नौकर भरतीच्या संदर्भात मनोहर पाऊनकर यांच्यावर प्रचंड नाराजगी चंद्रपूर जिल्ह्यात आहे . शिवाय पक्षांतर्गत त्यांचं खूप महत्त्व आहे असेही दिसत नाही. आणि जातीय राजकारण पाहता कुणबी समाजामध्ये ही त्यांना खूप महत्त्व आहे, असे कधी आढळून आलेले नाही. तरीसुद्धा मनोहर पाऊणकर यांचा भाजप प्रवेश झालाच.

धानोरकर दांपत्याने या नोकर भरती संदर्भात प्रचंड टीका करत , आरोप करत चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष मनोहर पाऊणकर यांच्यावर सुद्धा अप्रत्यक्ष रित्या ताशेरे ओढले होते . केवळ याच कारणामुळे म्हणजे धानोरकरांचा विरोध होता म्हणून मग मनोहर पाऊनकर यांना आपल्या पक्षात घ्यायचे का ? हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे . निवडणुकीच्या तोंडावर वेगवेगळ्या समाजातील काही लोकांना की ज्यांचे नाव चर्चेत आहेत , अशांना भाजप आपल्या पक्षामध्ये घेतो आहे . परंतु ही इन्कमिंग प्रोसेस करत असताना त्या व्यक्तीचं सामाजिक स्थान नेमकं काय ? त्या व्यक्तीच्या पक्ष प्रवेशामागची पार्श्वभूमी काय ? याचाही विचार भाजपने करायला हवा कारण तब्बल तीन महिने जेलमध्ये राहून आलेले मनोहर पाऊनकर यांना भाजपने पक्षात घेऊन नेमकं काय साध्य केलं ?? असा प्रश्न आता चंद्रपूरकर विचारत आहेत. अशा निरर्थक पक्षप्रवेशामुळे पक्षांतर्गत नाराजी वाढत चालली असून पक्षामध्ये असलेली दुसऱ्या आणि तिसऱ्या फळीचे पदाधिकारी , कार्यकर्ते आज वैयक्तिकरित्या जेव्हा चर्चा करत आहेत तेव्हा, याचा भाजपला काहीही फायदा होणार नाही . हे स्पष्टपणे आपसात बोलल्या जात आहे. जातीय समीकरण जोडण्याच्या प्रयत्नात भाजप आपल्याच पक्षातील एकनिष्ठ पदाधिकारी , कार्यकर्ते आणि परंपरागत मतदार यांना गमावणार तर नाही ना ? असा प्रश्न देवतळे आणि पाऊनकर यांच्या पक्षप्रवेशामुळे चंद्रपुरात चर्चिल्या जात आहे. यावर पक्षश्रेष्ठींनी निश्चित चिंतन आणि मनन करावे.

# पाडेगावात महापुरुष जयंती महोत्सव

## ११ ते १५ एप्रिल दरम्यान होणार प्रबोधनाचे मंथन







आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** समतेची व सामाजिक ऐक्याची कास धरून जात-पात धर्म भेदाची जळमटे झटकून टाकूया, चला समाज घडवूया हा प्रबोधनाचा विचार सोबत घेऊन पाडेगाव, ता.फलटण येथे पाडेगांव सामाजिक विकास फाउंडेशन यांच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी महापुरुष जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

गुरुवार दिनांक ११ एप्रिल ते सोमवार दि.१५ एप्रिल पर्यंत महापुरुष जयंती महोत्सव कार्यक्रम संपन्न होणार आहे. यावेळी विविध समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात येत आहेत. अशी माहिती पाडेगांव सामाजिक विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गिरीश बनकर यांनी दिली. या महोत्सवाचे उदघाटन गुरुवार दिनांक ११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंती दिनी होत आहे. सकाळी ठीक आठ वाजता दीपप्रज्वलनाने व ग्रंथदिंडीने महोत्सवास सुरुवात करण्यात येणार आहे.

सायंकाळी ७ वाजता विद्रोही कवी,शिव, फुले, शाहु, आंबेडकर विचारक प्रचारक, दंगलकार नितीन चंदनशिवे हे फुले, शाहू,आंबेडकर यांचे पुरोगामी विचार या विषयावर विचार मांडणार आहेत. तसेच रात्री ८ वाजता श्रमिक मुक्ती दलाचे संस्थापक अध्यक्ष कॉ. डॉ. भारत पाटणकर यांचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जीवन गौरव सोहळा संपन्न करण्यात येणार आहे. यावेळी ते मार्गदर्शन करणार आहेत.

शुक्रवार दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता पुरोगामी विचारवंत व लेखक डॉ.कौस्तुभ विलास बुर्डे यांचे "सार्वजनिक सत्यधर्म आणि समाज व्यवस्था" यावर व्याख्यान होणार आहे. शनिवार दिनांक १३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता "होळकरशाहीचा क्रांतिकारी इतिहास" या विषयावर सुप्रसिद्ध व्याख्यात्या व पुरोगामी विचारवंत करिश्मा सुयश गावडे (पाटील) ह्या मार्गदर्शन करणार आहेत.रविवार दिनांक १४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता महापुरूषांची रथयात्रा संपन्न होणार असून या रथयात्रेतून पारंपारिक व सांस्कृतिक वैविध्यतेने पथदर्शन असणार आहे.

सोमवार दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी साडे सहा वाजता सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न करण्यात येणार आहे.यावेळी विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान केला जाणार आहे.सायंकाळी ७ वाजता महाहोमनिस्टर हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाचे सादरीकरण अभिनेत्री,होम मिनिस्टर फेम आणि समाज प्रबोधन करणाऱ्या मेघना झुझम (भिंबर पाटील ) ह्या करणार आहेत. करूया जागर स्त्रीशक्तीचा,अन खेळ खेळूया पैठणीचा या कार्यक्रमातुन खळखळून हसवणाऱ्या खेळांची बुलेट ट्रेन, सोबत तडका धमाल मस्तीचा आणि सोबत सामाजिक बांधिलकी जपणारे प्रबोधन करणार आहेत.

दिनांक ११ एप्रिल ते १५ एप्रिल या दरम्यान संपन्न होत असलेल्या विविध समाज प्रबोधन पर कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गिरीश बनकर यांनी केलेले आहे.



# जिल्हा परिषद गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** लोकसभा क्षेत्रातील फुलंब्री तालुक्यातील गणोरी जिल्हा परिषद गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक किनगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी आदरणीय खासदार रावसाहेबजी दानवे दादा, आदरणीय आमदार हरिभाऊजी बागडे नाना, लोकसभा प्रमुख मा विजय औताडे, जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सौ.अनुराधाताई चव्हाण, भाजपा तालुका अध्यक्ष मा सांडू अण्णा जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाथ्रीकर बाळासाहेब तांदळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शुक्रवारपासून चार दिवस पावसाचा अंदाज

## जळगाव, मालेगाव, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, नांदेडला पारा ४० अंशांवर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यावर असलेल्या हवेच्या द्रोणीय स्थितीमुळे आद्रतेचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे शुक्रवार, पाच एप्रिलपासून चार दिवस राज्यभरात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. या काळात तापमानातही दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण तमिळनाडू ते पूर्व विदर्भापर्यंत हवेच्या खालच्या स्तरात एक द्रोणिका रेषा तयार झाली आहे. ही रेषा कर्नाटक आणि मराठवाड्यावरून जाते. त्यामुळे शुक्रवारपासून हवेत आद्रता वाढून पाच ते आठ एप्रिल दरम्यान मध्य महाराष्ट्रात. सहा ते आठ एप्रिल या काळात कोकण, मराठवाड्यात आणि सात ते आठ एप्रिल दरम्यान विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

हिमालयाच्या पायथ्याचा भाग आणि ईशान्य भारत वगळता राजस्थान, दिल्लीपासून संपूर्ण दक्षिण भारतात कमाल तापमान सरासरी ३८ ते ४० अंश सेल्सिअसवर गेले आहे. पुढील चार-पाच दिवस ही तापमानवाढ कायम राहण्याचा अंदाज आहे. राज्यात प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरी ३८ ते ४० अंशाच्या दरम्यान राहील. मराठवाड्यात रात्रीच्या तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होऊन रात्रीही उकाडा जाणवू शकतो, असेही हवामान विभागाने म्हटले आहे. विदर्भातील ब्रह्मपुरी येथे मंगळवारी ४२.३ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. जळगाव, मालेगाव, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, नांदेड, बीडसह संपूर्ण विदर्भात पारा ४० अंशांवर होता.



# सोबलगाव फाटा येथे पेव्हर ब्लॉक ॲण्ड मॅनिफॅक्चरिंग आर्टिकल कंपनीचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सोबलगाव फाटा येथे सागर काटकर यांच्या श्री काटकर पेव्हर ब्लॉक ॲण्ड मॅनिफॅक्चरींग आर्टिकल कंपनीच्या भव्य शुभारंभ झाला.

याप्रसंगी आमदार सतीश चव्हाण द्वारकाभाऊ पाथ्रीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल जाधव, शहराध्यक्ष गजानन फुलारे, माजी सभापती महेश उबाळे, आदिनाथ साळुंके, प्रकाश नलावडे, विकास कापसे, ज्ञानेश्वर दुधारे, मिठू महालकर, प्रविण निकम, किशोर निकम, बाळू काटकर, केशव वाघ, संजय काळे, दिपक घुले, पंकज लोखंडे, कपिल ढेपले, सुनिल निकम, अनिल निकम आदींसह संपूर्ण काटकर परिवार व इतर मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होता

# महिला दिनानिमित्त जागर स्त्री शक्तीचा

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** दिनांक 31 मार्च 2023 रोज रविवारला प्रियदर्शनी सभागृहात महिलांचे सुहेतूक मनोरंजन तथा सशक्तिकरण .सबलीकरण या उद्देशाने प्रेरित सौ छबुताई वैरागडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत उत्तुंग महिला मंचद्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त- जागर स्त्री शक्तीचा ....सत्कार उत्कृष्ट जोडीचा.... भारतीय सणावर आधारित लोक नृत्य - युगलनृत्य( कपल डान्स)व समूह नृत्य स्पर्धा( ग्रुप डान्स)प्रचंड जल्लोषात व उल्हासात पार पडली.

सदर कार्यक्रमाच्या उद्घाटिका माननीय सपनाताई सुधीर भाऊ मुनगंटीवार -सामाजिक कार्यकर्त्या भाजपा या होत्या तर उद्घाटक ऑल इंडिया ऑर्गनायझेशन केमिस्ट अँड ड्रगिस्ट चंद्रपूर चे अध्यक्ष माननीय श्री मुकुंद भाऊ दुबेजी हे होते. सदर कार्यक्रमाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष अॅड. विजयाताई बांगडे यांनी भूषवले. कार्यक्रमास राहुल जी पावडे माजी उपमहापौर अध्यक्ष श्री ब्रिज भूषण पझारे जी अध्यक्ष संजय गांधी निराधार योजना .माननीय सीमाताई कोठारी करण कोठारी ज्वेलर्स. माननीय डॉक्टर आनंदजी बेंदले जनरल फिजिशियन आकाश शुक्ला अॅड. सौ वैशाली मनोज टोंगे, श्री राधेश्याम अडाणीया माजी नगरसेविक नगरसेवक, अध्यक्ष , गोमती पाचभाई, नंदू मामा, राजेंद्र भाऊ रघाताटे अध्यक्ष जेसी, आय, ग्रुप यांच्या उपस्थितीत पार पडले तसेच डॉक्टर स्नेहल पोटदुखे. सौ अंकिता पियुष आंबटकर डायरेक्टर एस एस सी एम संयम सोमय्या पॉलिटेक्निक.ग्रुप .श्री लोकेश जी यादव साईकृपा प्लायवूड अँड हार्डवेअर. श्री हर्षल जुमडे श्री साई संताजी पेंट्स ,श्री मधुरजी कपूर वंडर चीफ कूक विथ प्राइड आणि एडवोकेट आशिष मुंदडा यांच्या सहकार्याने ही स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली सदर स्पर्धेत एकूण सात कपल डान्स व 40 ग्रुप डान्सनी म्हणजेच चारशे ते साडेचारशे स्पर्धकांनी सहभाग नोंदवला व आपली नृत्य कला. नृत्य कौशल्य मान्यवरांच्या समोर सादर केले.

सदर कपल डान्स स्पर्धेत प्रथम क्रमांक श्री किरण व सौ रागिनी यांनी पटकावला तर डॉक्टर रवी व सौ अर्चना इटनकर ,यांनी द्वितीय तर श्री विजय आणि सौ प्रियंका खनके यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. सदर समूह नृत्य (ग्रुप डान्सस्पर्धे)त गृही गर्ल्स ग्रुप यांना प्रथम डान्सिंग क्वीन ग्रुप यांना द्वितीय तर नटराज वुमन्स ग्रुपने तृतीय क्रमांक पटकावला. जुरी ग्रुपच्या परीक्षणातून रजनी अँड ग्रुप यांनी प्रथम क्रमांक डेझलस क्रीयू ग्रुपने द्वितीय तर लेवल अप क्रीयू ग्रुपने तृतीय क्रमांक मिळवला विशेष प्रोत्साहन पर अथवा उत्तेजनार्थ पारितोषिक ब्लॉसम ग्रुप. वुमन्स ग्रुप ऑल राऊंडर इंडियन ग्रुप. हिरकणी ग्रुप. महाकाली चंद्रपूर ग्रुप, बी.जी. ग्रुप महिला पतंजली योग मंडळ इत्यादी ग्रुपला प्रोत्साहन पर पारितोषिक प्रदान करण्यात आले. सर्व मान्यवरांनी मोठ्या प्रमाणात सर्व विजेत्यांचे मोठी रक्कम देऊन कौतुक , गौरव केला तर सर्व सहभागी स्पर्धकांचे कौतुक करून प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या कार्यक्रमाला लाभलेल्या सभागृहातील तुडुंब प्रचंड प्रतिसादात्मक गर्दी पाहून कार्यक्रमाच्या यशस्वी ते बाबत उत्कृष्ट मंचची उत्तुंग भरारी या विशेषनाने मान्यवरांनी कौतुक केले.

सदर स्पर्धेचे सूत्रसंचालन सर्वपरिचित मधुर भाषिक प्रज्ञाताई जीवन कर व सु मधुर वाणीने सर्व प्रेक्षकांचे मने जिंकणारी विशाखा सरणे यांनी संचालन करून कार्यक्रमाचे उत्साहवर्धन केले तर आभार स्नेहल बांगडे यांनी मानले. कार्यक्रमाला लाभलेल्या विराट प्रतिसादाबाबत छबुताई वैरागडे यांनी सर्व सदस्य,महिलांचे सू हृदयतेने धन्यवाद व आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, साक्षी कार्लेकर, प्रा, स्नेहल बांगडे, सारिका भुते, प्रा. धनश्री मुसने, किरण बल्की, मनीषा कन्नमवार , पायल अनडेल्लवार वैशाली कन्नमवार, अर्चना चहारे, आयुशी भुते, जोत्सना येवले सारिका बोराडे, वसुधा बोडखे, पूजा पडोळे, प्रणिता जुमडे, योगिता धानेवार, अभिलाषा मेंदुळकर प्रिती लखदिवे, माया खनके, मंगला रुद्रपवार, जयश्री साखरकर, अप्रना चीडे, सुवर्णा लोखंडे यांनी अतिशय परिक्षम घेतले.

# नाशिक जिल्ह्यातील धरणसाठा ३१ टक्क्यांवर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** उन्हाच्या तीव्रतेसह पाणी टंचाईचे चटके सर्वत्र जाणवत असताना जिल्ह्यातील धरणसाठा वेगाने कमी होत असून एप्रिलच्या प्रारंभी लहान-मोठ्या २३ धरणांमध्ये २० हजार ५६१ दशलक्ष घनफूट म्हणजे केवळ ३१.३१ टक्के जलसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १५ टक्के कमी जलसाठा आहे. नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूरमध्ये ४७ टक्के जलसाठा आहे.

पावसाअभावी यंदा धरणे पूर्ण क्षमतेने भरली नाहीत. समन्यायी तत्वावर पाणी वाटपाच्या सूत्राने जिल्ह्यातील काही धरणांमधून मराठवाड्यातील जायकवाडीसाठी पाणी द्यावे लागले होते. एकूण गरज वाढत असताना जलसाठ्याचे घटते प्रमाण यंदाचा चिंतेचा विषय ठरला आहे. गेल्या वर्षीचा विचार करता यंदा धरणांमध्ये १० हजार दशलक्ष घनफूट इतका कमी जलसाठा आहे. गतवर्षी एप्रिसच्या प्रारंभी धरणांमध्ये ३० हजार ५४० दशलक्ष घनफूट (४६.५१ टक्के) जलसाठा होता. एक-दोन धरणांचा अपवाद वगळता जवळपास सर्वच धरणांतील जलसाठा निम्याहून कमी झाला आहे. पालखेडमध्ये (६१ टक्के) व नांदूरमध्यमेश्वर बंधारा (९८) हे वगळता कुठल्याही धरणात ५० टक्क्यांपेक्षा जास्त जलसाठा नाही. काश्यपीमध्ये ८४४ दशलक्ष घनफूट (४५), गौतमी गोदावरी ७०२ (३७), आळंदी ३०४ (३७), करंजवण (१३२५ (२४), ओझरखेड ४४९ (२१), दारणा १७६० (२४), मुकणे २२२१ (३०), वालदेवी ४८१ (४२), चणकापूर ७११ (२९), हरणबारी ४५५ (३९), गिरणा ५७९० (३१), पुनद ९९९ दशलक्ष घनफूट (७६ टक्के) असा जलसाठा आहे. नागासाक्या धरण आधीपासून कोरडेठाक आहे. या पाठोपाठ पुणेगाव (०.८०), तिसगाव (पाच टक्के) धरणांची त्या दिशेने वाटचाल सुरू आहे. वाघाड (१९ टक्के), ओझरखेड (२१), भावली (१३), कडवा (२१), केळझर (१७), माणिकपूज (११) असा जलसाठा आहे. आठ धरणांमध्ये तुलनेत कमी जलसाठा आहे.

# पंकजाताई मुंडेंच्या मार्गदर्शनाखाली बूथ विजय अभियान प्रभावीपणे राबवणार

## प्रत्येक बूथवर 370 मते वाढवण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्न करणार : भाजप प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज





**अंबाजोगाई :** लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यभर 3 एप्रील पासून सहा दिवसीय 'बूथ विजय अभियान' राबवण्यात येणार, या अभियानातर्गंत प्रत्येक बूथवर मागच्या निवडणुकीपेक्षा 370 मते वाढविण्यासाठी बीड लोकसभा मतदारसंघात आमच्या नेत्या पंकजाताई मुंडे व खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मार्गदर्शनाखाली सर्व लोकप्रतिनिधी जिल्हा प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते विविध उपक्रम हाती घेणार असल्याची माहिती पक्षाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी दिली.

'बूथ विजय अभियान' अंतर्गत समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य असून प्रत्येक बूथवर या 6 दिवसांत विविध उपक्रम हाती घेण्यात येणार त्या अनुषंगाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले की, घरोघरी पत्रके पोहोचवून मतदारांशी थेट संपर्क साधणे, प्रत्येक घर व वाहनावर स्टिकर्स लावणे, लाभार्थींशी नियमित संपर्कात राहणे, प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी भाजपाचा झेंडा लावणे आदी उपक्रम राबविले जातील. युवा वर्ग, महिला वर्ग असे समाजातील विविध घटकांसाठी 5 समूह बैठका ही घेण्यात येतील अशी माहिती कुलकर्णी यांनी दिली. भाजपा विरोधी समजल्या जाणाऱ्या मतदारांपर्यंत मोदी सरकारचे कार्य, योजना पोहोचवून भाजपाला मत देण्यासाठी त्यांचे मन वळविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. बूथपासून दूर रहाणाऱ्या मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येईल. शिवाय बूथ समिती व पन्नास प्रमुखांची नियुक्ती तसेच 100 हून अधिक जणांचा व्हॉट्सपग्रूप बनविण्यात येईल. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात बुथ कार्यकर्ते व पन्ना प्रमुखांचे संमेलन घेण्यात येणार असून संमेलनाला उपस्थित प्रत्येक बुथ अध्यक्षाला त्या त्या बुथनुसार मतांमधील वाटा किती असायला हवा तसेच मागच्या 3 निवडणुकांमधील मतदानाची आकडेवारी व आवश्यक माहिती देण्यात येणार आहे. संमेलनामध्ये बूथ समिती व पन्नास प्रमुखांकडून अपेक्षित असलेल्या कार्यावर व जबाबदारीबाबत विस्तृत चर्चा होणार असून उद्याच्या 6 एप्रिल रोजी पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त बीड जिल्ह्यात विविध उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

# ग्राहक संरक्षण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मोहीम

## ग्राहक पंचायतचा पुढाकार : ग्राहक आयोगातील रिक्त पदे भरा

आधुनिक केसरी न्यूज


**गडचिरोली :** ग्राहक आयोगातील रिक्त पदे त्वरित भरण्यात येवून ग्राहक संरक्षण कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने राज्य आयोगाकडे माहिती अधिकारात माहिती मागण्या साठी हजारो अर्ज पाठविण्याची मोहीम राज्यभर सुरू असून विदर्भातील 11 ही जिल्ह्यातून शेकडो अर्ज पाठविण्यात येत असल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे विदर्भ प्रांताध्यक्ष डॉ.नारायण मेहरे, सचिव नितीन काकडे, संघटक डॉ अजय गाडे यांनी दिली आहे. स्व. बिंदुमाधव जोशी,स्व. राजाभाऊ पोफळी, अॅड. गोविंददास मुंधडा व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्राहकांना शोषण मुक्त करण्यासाठी ग्राहक संरक्षण कायदा 1986 तयार केला. त्यामध्ये सर्व सामान्यांना शीघ्र न्याय मिळावा यासाठी ग्राहक न्यायालयाची तरतूद केली. ग्राहक हितासाठी अन्य ही तरतुदी केल्या. शासनाने त्यासाठी आर्थिक तरतूद सुद्धा केली. परंतु ग्राहक कायद्यातील तरतुदी खुंटीवर टांगून प्रशासनाकडून कारभार होत असल्याचा आरोप ग्राहक पंचायतीने केला आहे. राज्यातील अनेक ग्राहक न्यायालयात अध्यक्ष, सदस्य व आवश्यक कर्मचाऱ्यांची पदे दीर्घ काळापासून रिक्त असून ग्राहक न्यायालयाची कामे ठप्प झाली असल्याचे चित्र दिसून येत आहे. सुनावणी होत नसल्याने पीडित ग्राहक जिल्हा आयोगाच्या चकरा दिवाणी न्यायालया प्रमाणे मारत आहेत. सुधारित ग्राहक कायद्यातील मध्यस्थकल्पना केवळ कागदावरच दिसत असल्याचाही आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. माहिती अधिकारात माहिती मागविण्यात येवून राज्यात ग्राहक संरक्षण कायद्याच्या कशा चिंधड्या उडवण्यात येत आहे, आणि राज्य शासन ग्राहक संरक्षण कार्यात किती "दक्ष" आहे याची सर्वसामान्य जनतेला माहिती देणार असून आवश्यकता पडल्यास त्यासाठी उच्च न्यायालयात याचिका सुद्धा दाखल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यात अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते माहिती अधिकारात शेकडोंच्या संख्येत अर्ज राज्य आयोगाच्या जन माहिती अधिकाऱ्यां कडे पाठवत असून गडचिरोली जिल्ह्यातील या माहितीच्या अधिकारात माहिती मागण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे गडचिरोली जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत पतरंगे व जिल्हा संघटन मंत्री विजय कोतपल्लीवार, अरुण पोगळे, नरेन्द्रभाऊ चन्नावार, जितेन्द्र मुप्पिडवार, यादवराव करंडे, रामभाऊ काळबांधे, शंकरराव कस्तुरवार, विलास बल्लमवार, कमलेश पाटिल भोयर, बापुजी वडेट्टीवार इत्यादी पदाधिकारी यांही अर्ज सुपूर्द केले.

# लोणंद येथे संयुक्त जयंती सोहळ्याचे आयोजन

## 'उत्कृष्ट बौद्धमय घर' संकल्पनेतून होणार गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**



**लोणंद :** विश्वरत्न, क्रांतिसूर्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी व महात्मा ज्योतिराव फुले यांची १९७ वी संयुक्त जयंती सोहळा लोणंद ता.खंडाळा येथे आयोजित करण्यात आलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती लोणंद यांच्या विद्यमाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. गुरुवार दिनांक ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त सकाळी १० वाजता अभिवादन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.दुपारी १ वाजता वक्तृत्व स्पर्धा,४ वाजता निबंध स्पर्धा,सायंकाळी ७ वाजता "महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक आदर्श गुरूशिष्य" या विषयावर साक्षी गवळे (लातूरकर) यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच रात्री ८ वाजता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारी समिती सदस्य प्रशांत पोतदार हे "अंधश्रद्धेची दुनिया,चमत्काराची किमया"या विषयाला अनुसरून मार्गदर्शन करणार आहेत. शुक्रवार दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान खुल्या गटातील वक्तृत्व स्पर्धा संपन्न करण्यात येणार आहेत.रात्री ८ वाजता सम्राट समाज प्रबोधन गायन पार्टी प्रस्तुत "विचारांची भिमजयंती"कार्यक्रम होणार आहे.शनिवार दिनांक १३ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता राहुल किर्तिकर मुंबई नयना ठक्कर प्रेझेंट "ऑर्केस्ट्रा गित सरगम" हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

रविवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता ध्वजारोहण व समता सैनिल दल यांची ध्वजास मानवंदना देण्यात येणार आहे. बुद्धविहारात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बुद्ध वंदना,अभिवादन व मान्यवरांचे मनोगत होणार आहे. सायंकाळी ७ वाजता बुगीवुगी डान्स स्पर्धा (लहान गट आणि मोठा गट) तसेच बक्षीस वितरण व सत्कार समारंभ कार्यक्रम घेण्यात येणार आहे. सोमवार दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक असणार आहे. जयंती सोहळ्यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या वतीने करण्यात आलेले आहे. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म दिवस आणखी उत्साहाने साजरा व्हावा. म्हणून भारतीय बौद्ध महासभा शाखा लोणंद यांच्या वतीने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने या वर्षीपासून १४ एप्रिल रोजी 'उत्कृष्ट बौध्दमय घर' असणाऱ्या परिवाराचा रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे.या जयंतीच्या निमित्ताने स्वतःच्या घरावर आकर्षक विद्युत रोषणाई, घरावर निळा झेंडा,घरातील अंतर्गत व बाहेरील सजावट,घरामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बुध्द मुर्तीची सजावट तसेच संपूर्ण घर बौध्दमय असणाऱ्या बौद्ध परिवारास रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.प्रथम बक्षिस २५०१, द्वितीय बक्षिस १५०१ आणि तृतीय बक्षिस १००१ अशी बक्षीसे असणार आहेत. यात सहभागी होण्यासाठी सर्वांना प्रवेश विनामुल्य आहे. शनिवार दिनांक १३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत परीक्षण करण्यात येणार आहे.'उत्कृष्ट बौध्दमय घर" या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आलेले आहे.



# काल्याचा प्रसाद घेत वारकऱ्यांनी घेतला निरोप

## मंदिरात नाथवंशजांच्या तर मंदिराबाहेर नाथ विश्वस्तांच्या हस्ते फुटली दहिहंडी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथषष्ठी उत्सव सोहळ्यात नाथवंशजांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडून बुधवारी नाथषष्ठीची भक्तिपूर्ण वातावरणात सांगता झाली. नाथषष्ठीचा अभूतपूर्व सोहळा अनुभवून लाखो वारकरी भाविकांनी काल्याचा प्रसाद घेऊन श्री क्षेत्र पैठणनगरीचा निरोप घेतला. परंपरेनुसार नाथ वंशज रावसाहेब महाराज गोसावी यांच्या हस्ते नाथ समाधी मंदिरात तर नाथ विश्वस्ताच्या वतीने अक्रुर महाराज साखरे हस्ते सुर्यास्त समयी दहीहंडी फोडण्यात आली. या वेळी काल्याच्या प्रसादासाठी उपस्थित वारकरी भाविकांचे लक्ष काल्याच्या प्रसादाकडे होते. याचबरोबर दहीहंडीला लावण्यात आलेले लाडू मिळविण्यासाठी वारकरी भाविकांची स्पर्धा लागल्याचे दृश्य नाथ समाधी मंदिराच्या दरबारात दिसून आले. दहीहंडीचा काला फोडण्यापूर्वी टाळ, वीणा आणि मृंदगाच्या तालावर, हाती भगवा ध्वज पताका घेऊन भानुदास एकनाथांचा जयघोष करीत वारकऱ्यांबरोबरच उपस्थित मान्यवरांनी ठेका धरला. ज्ञानोबा माऊली तुकाराम, जय जय रामकृष्ण हरी गजर' करीत वारकऱ्यांसोबत मान्यवरांनीही फुगडी खेळून लक्ष वेधून घेतले. दहीहंडीला लावलेला भाग्य उजळवणारा लाही, मुरमुरे व गुळमिश्रित लाडू पकडण्यासाठी भाविकांची एकच झुंबड उडाली. दहीहंडी फोडल्यानंतर नाथवंशजांनी भाग्य उजळविणारे लाडू भाविकांत फेकले. त्या वेळी लाडू ज्या भाविकांच्या हातात पडला त्यास तेथील भाविकांनी गराडा घालून लाडूचा प्रसाद मिळविण्यात धन्यता मानली. यावेळी महिलांच्या गर्दीत जवळपास पाच लाडू फेकले होते. त्या ठिकाणी महिलांची उत्कंठा शिगेला पोचली होती. लाडूचा हा प्रसाद दहीहंडीच्या काल्याच्या प्रसादापेक्षाही महत्त्वाचा व रंगतदार वाटला. ज्या दिशेने हे लाडू फेकले जातील त्या दिशेने भाविक अक्षरशः जिवाची पर्वा न करता लाडूचा प्रसाद मिळविण्यात दंग झालेले दिसून आले. काहींचा गर्दीत कोसळून पडून प्रसाद मिळविल्याने आनंद गगनात मावेनासा झाला होता. यावेळी संभाजीनगरचे पालकमंत्री तथा पैठणचे आमदार संदिपान भुमरे यांची उपस्थिती होती. तसेच जि.प.चे. माजी सभापती विलासबापु भुमरे,मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे, माजी आमदार संजय वाघचौरे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय गोर्डे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया, जितु परदेशी, कैलास बरकसे, प्रशांत आव्हाड, शिवराज पारिक उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.सिध्देश्वर भोर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संजय देशमुख यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# आजच्या सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारी ही कविता आहे : प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. शिवाजी हुसे हे शेती मातीशी नाळ जोडून असलेले लढाऊ व संघर्षशील कार्यकर्ता कवी आहे. त्यामुळे त्यांना समाजातील विसंगती, शेतकऱ्यांचे प्रश्न, वर्तमान वास्तव त्यांना अस्वस्थ करते. सामाजिक प्रश्नांवर परखड भाष्य करणारी ही कविता असून सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडते. आता युद्ध अटळ आहे या संग्रहातील कविता ही आजच्या सामाजिक वास्तवाची कविता आहे असे प्रतिपादन मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी केले.(ता. ३१) शिवाजी हुसे यांच्या आता युद्ध अटळ आहे या कविता संग्रहाचे प्रकाशन छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेत संपन्न झाले या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष स्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार होते तर व्यासपीठावर डॉ. राजकुमार यल्लावाड, प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. दिलिप बिरुटे, कवी डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती होती. प्राचार्य ठाले पाटील यांनी या कवितेवर भाष्य करतांना सामर्थ्य स्थळाबरोबरच उणिवा ही दाखवून परखडपणे विचार मांडले. संग्रहावर भाष्य करतांना डॉ. राजकुमार एल्लावाड म्हणाले की, विरूपं घालवण्यासाठी उठवलेला आवाज व शब्दाविष्कार म्हणजे आता युद्ध अटळ आहे हा संग्रह होय. संवाद विरोध, समतोल ही लयतत्व सांभाळणारी ही कलाकृती आहे. अन्वयार्थक शिर्षक, आशयाशी अनुरूप भाषा शैली आणि कृषी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील विरूपावर कवी शिवाजी हुसे यांनी प्रहार केला आहे. असे मत व्यक्त करून विस्तृत भाष्य केले. अध्यक्षीय समारोप करतांना मानसिंह पवार म्हणाले की, आजची परिस्थिती भयावह असून प्रत्येकाला आज आपापल्या क्षेत्रात संघर्षाला सामोरे जावे लागत आहे. दैनंदिन काम करतांना प्रत्येकजण एक प्रकारे युद्धावरच असतो. घरी येई पर्यंत त्याच्या समोर काय प्रश्न निर्माण होतील सांगता येत नाही. त्यामुळे आता केवळ युद्ध अटळ नसून युद्धाला सुरुवात झाली आहे. डॉ. हुसे यांनी आपल्या कवितेतून परखड भाष्य केले आहे. असे मत मांडले.

प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की डॉ. हुसे हे केवळ वर्गापुरते शिक्षक नसून त्यांनी सामाजिक बांधिलकी स्विकारून समाजोपयोगी उपक्रमात स्वतःला झोकुन दिले आहे. त्यांच्या प्रयत्नाने मोठी वाङ्मय चळवळ ऊभी झाली असून त्यातून अनेक नवोदित कवी, लेखक घडले असल्याचे विचार व्यक्त केले. कवी शिवाजी हुसे यांनी मनोगतातून आपली भूमिका मांडली. प्रास्ताविक डॉ. दिलिप बिरुटे यांनी केले. आदित्य प्रकाशनचे प्रकाशक विलास फुटाणे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. वासुदेव मुलाटे,डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. मुरहरी केळे, प्राचार्य छाया महाजन, प्राचार्य सुनंदा तिडके, प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव, निळकंठ डाके,उत्तम बावस्कर, शरद भिंगारे, डॉ. अंबादास सगट, ॲड. कृष्णा जाधव,पुंडलिकराव घुगे, पंडितराव घुगे, गोपिनाथ वाघ, सुधीर घुगे, डॉ. संजय गव्हाणे, डॉ. सुभाष बागल, प्राचार्य डॉ. युवराज धबडगे, प्राचार्य डॉ. रामकिसन दहिफळे, यांच्यासह कन्नड, सिल्लोड, पैठण, वैजापूर, जालना, छ. संभाजीनगर येथील विविध क्षेत्रातील मान्यवर , साहित्यिक , प्राध्यापक , महिला यांच्या मोठ्या संख्येनीउपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. दैवत सावंत यांनी केले तर आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले.

# ६३९ गावे-वाड्यांना टँकरने पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पाणी टंचाईने भीषण स्वरुप धारण केले असून सात तालुक्यांतील २०३ गावे आणि ४३६ वाड्यांना २१० टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. टँकर आणि गावांसाठी जिल्ह्यात ६७ खासगी विहिरी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत. मनमाडसारख्या शहरात महिन्यातून, नांदगावमध्ये २२ दिवसाआड तर चांदवडमध्ये पाच-सहा दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. अशुध्द पाणी पुरवठ्यामुळे आरोग्याचे प्रश्नही निर्माण होत आहेत. सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात टंचाईची झळ बसत आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या धामधुमीत पाण्याचा प्रश्नही ऐरणीवर येत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अहवालावरून एप्रिलमध्ये पाणी टंचाईची तीव्रता सर्वत्र वाढल्याचे समोर आले आहे. नांदगाव, येवला या तालुक्यास सर्वाधिक झळ बसत असून मालेगाव, चांदवड, बागलाण, देवळा व सिन्नरमधील अनेक गाव-वाड्यांची तहान टँकरद्वारे भागवावी लागत आहे. येवला तालुक्यात ६७ गावे-वाड्यांना (४५ टँकर), नांदगावमध्ये २६९ गाव-वाड्यांना (४९), बागलाण तालुक्यात ३२ गावे-वाडे (२५), मालेगाव ७४ गावे-वाड्या (२४), देवळा ५३ गावे-वाड्या (२५), सिन्नर तालुक्यात ७६ गावे-वाड्यांना (१६) टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. जिल्ह्यात एकूण ६३९ गावे-वाड्यांची भिस्त टँकरवर आहे. टँकरच्या ४३६ फेऱ्या मंजूर असून प्रत्यक्षात ते ४३९ फेऱ्या मारत असल्याचे यंत्रणेने म्हटले आहे. आठ गावातील पाणी पुरवठा आठ तर टँकर भरण्यासाठी ६४ अशा एकूण ६७ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात ४७ टक्के जलसाठा आहे . मनपा प्रशासनाने तीन महिन्यांपूर्वी बचतीसाठी आठवड्यातून एक दिवस पाणी कपातीचा विचार केला होता . तथापि, निवडणूक काळात वेगळा संदेश जाईल, या धास्तीतून तो टाळला गेल्याची चर्चा होत आहे . एक ते दीड महिन्यापासून जल वाहिनीची देखभाल-दुरुस्ती, शुध्दीकरण केंद्राशी संबंधित कामांचे कारण देऊन अधूनमधून पाणी पुरवठा बंद केला आहे . याचा संबंध अप्रत्यक्षपणे कपातीशी जोडला जात आहे . नियमित आढावा आणि पुरेसा जलसाठा असल्याचे दर्शवत कपातीचा निर्णय होणार नाही, याची दक्षता घेतली गेल्याची चर्चा होत आहे . मनपाने पाण्याचा काटकसरीने वापर, वाहन व बगिच्यासाठी पिण्याच्या वापरास प्रतिबंध आदी सूचना केल्या आहेत .

जिल्ह्यातील शेकडो गावे-वाड्यांना टँकरने पाणी द्यावे लागत असताना आठ तालुक्यांमध्ये अद्याप टँकर सुरू झालेले नाहीत. अर्थात तेथील काही भागात पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे.

टंचाईत अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याने आरोग्याच्या प्रश्नांनाही तोंड द्यावे लागत आहे. येवला व मनमाडमध्ये तशीच स्थिती आहे. येवला शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलशुध्दीकरण प्रकल्पात गाळ काढण्याची व्यवस्था नसल्याने प्युरिफायर फिरत नाही. अशुध्द पाण्यामुळे आजारांचे प्रमाण वाढले आहे. घरगुती पाणी शुध्द करणाऱ्या यंत्रांचा आणि येवला नगरपालिकेकडून खासगी संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या पाणी विक्रीचा व्यवसाय तेजीत आहे. अनेक भागात शुध्द पाण्यासाठी नागरिकांना पैसा खर्च करावा लागत आहे.


गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# द्राक्षे बागायतदार संघाचे पोलीस महानिरीक्षकांना निवेदन

## समाजमाध्यमात द्राक्षे पिकाची बदनामी करणाऱ्यांविरोधात कार्यवाही करा

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** समाज माध्यमातुन द्राक्षे पिकाबद्दल गैरसमज व अफवा पसरविणाऱ्या विपुल सुतारीया या फेसबुक, इन्स्टाग्राम खाते चालकावर कारवाई करावी अशी मागणी महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघाचे पदाधिकारी व द्राक्षे उत्पादक शेतकऱ्यांनी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरिक्षक बी.जी. शेखर पाटील यांच्याकडे समक्ष निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या आठ दहा वर्षांपासून द्राक्ष पिकावर मोठे संकटे येत आहेत. द्राक्ष हे वर्षभराचे पीक अपार मेहनतीतून उभे केलेले असते. चालू द्राक्ष हंगामात गारपीट अन अवकाळी पाऊस यामुळे द्राक्षाचे नुकसान झाले होते. परंतु त्यातुनही शेडनेट, क्रॉप कव्हर यासारख्या साधनांचा वापर करुन द्राक्षमाल वाचवत तो मोठ्या कष्टाने बाजार पेठेत विकला जात आहे. विदेशाबरोबरच देशातील गुजरात, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल बिहार, दिल्ली, काठमांडू



या प्रमुख राज्यात नाशिक विभागातील द्राक्षमालास मोठी मागणी आहे. त्या बाजारपेठेत द्राक्षमालाचा खप वाढला आहे. द्राक्षमालाची वाढती मागणी व बाजार भावातील तेजी यामुळे द्राक्ष पिकाला बदनाम करणेसाठी व द्राक्ष पिकाचे पर्यायाने शेतकरी व व्यापारी यांचे नुकसान होणेसाठी जाणीपुर्वक समाजमाध्यमातुन द्राक्ष या पिकाबद्दल विपुल सुतारीया या फेसबुक, इन्स्टाग्राम खात्यावरून द्राक्ष हे फळ आरोग्यास अपायकारक आहे, त्याचे सेवन करु नये, द्राक्ष फळात विविध रासायनिक औषधांचे अंश असतात या अफवा पसरवुन त्याचा ग्राहक वर्ग बंद केला जात आहे. त्यामुळे विपुल सुतारीया या खात्याची चौकशी करुन कठोर कारवाई करण्यात यावी व द्राक्ष पिकाची बदनामी करुन बाजारात ग्राहकांवर परिणाम घडविणाऱ्या सदर खाते चालकावर माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी द्राक्षे बागायतदार संघाचे पदाधिकारी व द्राक्षे उत्पादक शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे मागणी केली. या तक्रारीची बी.जी. शेखरपाटील यांनी तातडीने दखल घेऊन नाशिकचे पोलिस अधिक्षक विक्रम देशमाने यांना याबाबत पुढील कारवाईचे निर्देश दिले. पोलीस अधिक्षकांनी सायबर शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील यांचेमार्फत सायबर सेलवर द्राक्ष बागायतदार संघाचे वतीने तक्रार नोंदवुन घेतली.

शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे उपाध्यक्ष कैलासराव भोसले, संचालक रावसाहेब रायते, सुरेशमामा कळमकर ,नाशिक विभागीय मानद सचिव बाळासाहेब गडाख, संचालक रामनाथ शिंदे, बाळासाहेब वाघ, शिवलाल ढोमसे आदींसह द्राक्ष बागायतदार संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

> निर्यातक्षम व स्थानिक द्राक्षमालाचे उत्पादन हे अपेडाने ठरवुन दिलेल्या रासायनिक अंश विरहीत नियमावलीनुसार घेतले जाते . त्यात मानवी शरिरास अपायकारक असा कोणताही घटक नसल्याचे एन .आर .सी मार्फत कळविले जाते . प्रयोगशाळेत त्यांची तपासणी केली जाते व ती शासनाच्या कृषी विभागाला सादर केली जाते . तरी देखील अर्धवट व चुकीच्या माहितीच्या आधारे समाज माध्यमातुन द्राक्षे पिकाबद्दल जाणीवपुर्वक दिशाभुल करणारे संदेश पसरविले जात आहे .
>
> **– वकील रामनाथ शिंदे**
> **संचालक, द्राक्षे बागायतदार संघ**




# भाजपा हटावचा दिला नारा

## लोह्यात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची बैठक संपन्न; अनेक नेत्यांनी केले मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** लातूर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लोहा येथील व्यंकटेश गार्डन मध्ये दि. २ एप्रिल रोजी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेन (उबाठा), शेकाप या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या बैठक संपन्न झाली.

यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार ईश्वरराव भोसीकर होते तर प्रमुख उपस्थिती काँग्रेसचे नांदेड दक्षीणचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे, शिवसेना (उबाठा)चे लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार हनुमंतराव बेटमोगरेकर शिवसेना (उबाठा) चे महाराष्ट्र प्रदेश संघटक काँग्रेसचे एकनाथ दादा पवार, व्हाईस चेअरमन विजय देशमुख, तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, ज्येष्ठ नगरसेवक बबनराव निर्मले, माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीनिवास मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य पुरूषोत्तम धोंडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य रंगनाथ भुजबळ, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, शेकापचे तालुकाध्यक्ष नागेश पाटील हिलाल, मुक्तेश्वर धोंडगे, कंधारचे माजी उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजीराव पांडागळे,भीमराव पाटील शिंदे, प्रभाकर पवार, दयानंद येवले, यांच्या सहीत महाविकास आघाडीचे लोहा - कंधारमधील नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना नांदेड दक्षीणचे काँग्रेसचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे म्हणाले की, नांदेड, लातूर , हिंगोली येथे महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होणार आहेत . खा . अशोकराव चव्हाण हे भाजपा मध्ये गेले पण कार्यकर्ते व जनता गेली नाहीत जनतेनी लातूर चे काँग्रेसचे उमेदवार डॉ .शिवाजी काळगे व नांदेडचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांना विजयी करावे असे आवाहन आ . मोहन अण्णा हंबर्डे म्हणाले .

यावेळी शिवसेना उबाठा चे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार म्हणाले की, नांदेड – लातुर च्या दोन्ही खासदारांवर जनता प्रचंड नाराज आहे . ग्रामीण भागाचा वाडी तांड्याचा विकास खुंटला आहे तेव्हा विकासासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा असे एकनाथ दादा पवार म्हणाले .

शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी ही मार्गदर्शन केले व त्या म्हणाल्या भाजपाला पराभूत करा व महाविकास आघाडीला विजयी करा .

यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले की, पहिलं म्हण होते ईडा पिडा टळो बळी चे राज्य येवो पण आता जनता म्हणत शाह, मोदी हटाव लोकशाही बचाव . सोयाबीनला भाव नाही कापसाला भाव नाही 50 पैशाची ॲसिडिटी . गोळी 10 रुपयाला केली आहे तेव्हा भाजपा युती ला हटवून महाविकास आघाडीला विजयी करा असे माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले .

तसेच यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांनी ही जोरदार फटकेबाजी केली त्यांनी नांदेड व लातूरच्या दोन्ही खासदारांचा समाचार घेतला . जनता माझी मी जनतेचा असा म्हणणारा नेत्याला विचारा किती दारु दुकान आणता . आता काँग्रेसला विजयी करा भाजपाला हद्दपार करा असे शरद पाटील पवार म्हणाले .

तसेच यावेळी अध्यक्षीय भाषणात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार ईश्वरराव भोसीकर म्हणाले की, रावणा प्रमाणे मोदी ला अहंकार झाला आहे . आपकी बार 400 पार कशामुळे म्हणत आहेत . रावणा प्रमाणे मोदीचा ही पराभव होणार आहे . तेव्हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा, शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवारांना विजयी करा असे माजी आमदार ईश्वरराव भोसीकर म्हणाले .

# व्याघ्रप्रकल्पात वाघिणीचा संशयास्पद मृत्यू; तीन महिन्यात ११ वाघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पेंच व्याघ्रप्रकल्पातील सिल्लारी प्रवेशद्वाराजवळ पूर्व पेंच वनक्षेत्राच्या कुटुंबा बीटमधील कक्ष क्र. ५३१ मध्ये वाघिणीचा मृत्यू झाला. मृत्यूसमयी ती अतिशय अत्यवस्थ होती आणि ओकारी करत होती. पर्यटकांसमोरच तिने प्राण सोडला. मृत्युसमयीची तीची एकूणच अवस्था पाहता हा मृत्यू संशयास्पद असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, राज्यात गेल्या तीन महिन्यात ११ वाघ मृत्युमुखी पडले आहेत.

कुटुंबा बीटमधूनच बरेचदा मासेमारांचे जाणेयेणे असते आणि पेंच प्रशासन व मासेमार यांच्यात कायम एक अघोषित युद्ध आहे, हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्यामुळे हा वीषबाधेचा प्रकार तर नसावा, अशीही एक शंका व्यक्त केली जात आहे. पेंच व्याघ्रप्रकल्पात सायंकाळच्या सफारीला गेलेल्या पर्यटकांनी वाघिणीच्या शेवटच्या क्षणाबद्दल सांगितले. सिंचन पंप हाऊस परिसरात त्यांना ती दिसली. तिची अवस्था अतिशय वाईट होती. ती पाणी पीत होती आणि तिचा श्वासोच्छवास देखील नियमित नव्हता. तिला थोड्याच वेळात ओकारी झाली आणि काही क्षणातच ती मृत्युमुखी पडली. ही माहिती कळताच पशुवैद्यकीय अधिकारी व पेंचमधील अधिकारी त्याठिकाणी पोहोचले, पण तोपर्यंत ती मृत पावली होती. तिच्या मृत्युबद्दल दोन शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. एक म्हणजे तिला वीषबाधा झाली असावी, पण जर वीषबाधा झाली तर व्याघ्रप्रकल्पात हा प्रकार कसा घडला, असाही एक प्रश्न उपस्थित केला जात आहे. दुसरी एक शक्यता म्हणजे तिला काहीतरी व्याधी झाली असावी, अशीही एक शक्यता आहे. शरीरात खूप मोठ्या प्रमाणात संसर्ग, काही ठिकाणी गाठी तर काही ठिकाणी अळ्या दिसून आल्या. अवयवाचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले. शवविच्छेदन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सुजित कोलंगथ, पशुधनविकास अधिकारी डॉ. शिशुपाल मेश्राम, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. निखील बांगर यांनी केले. यानंतर सॅडल डॅम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पेंच व्याघ्रप्रकल्पाचे उपसंचालक डॉ. प्रभूनाथ शुक्ल, विभागीय वनाधिकारी सोनल मत्ते, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे प्रतिनिधी म्हणून मानद वन्यजीव रक्षक अजिंक्य भटकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) यांचे प्रतिनिधी म्हणून संजय करकरे, सहाय्यक वनसंरक्षक पूजा लिंबगावकर, वनपरिक्षेत्र अधिकारी विवेक राजूरकर, वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे व इतर उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर